नेमणे आहे
नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी तसेच न्यूज चॅनलकरिता प्रतिनिधी नेमणे आहेत.
१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११
jantaawajnews@gmail.com

दैनिक
# जनता आवाज

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्
पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.

सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल
सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।
राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १३८ रविवार, दि. १३ जुलै २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

# अ.नगरच्या अस्वच्छतेवर विधानसभेत कोणी बोलेल का?

## नागरी समस्यांनी नगरकर त्रस्त : करदाते हिशोब मागणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर : शहरासह उपनगरांमध्ये कचऱ्याचे ढिगारे साठलेले आहेत. त्यातील काही ढिगारे उचलले जात आहेत. काही ढिगारे अनेक दिवसांपासून तिथेच आहे. त्यामुळे शहरासह उपनगरांमध्ये जिकडे पहावे, तिकडे कचराच कचरा दिसून येत आहे. तसेच रस्ते व परिसर अस्वच्छ दिसून येत आहे. त्यामुळे पालिकेचे स्वच्छता कर्मचारी गेले कोठे? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.**

जिल्ह्यातील ज्वलंत प्रश्नांवर पावसाळी अधिवेशात चर्चा होत आहे. मात्र नगरकरांना स्वच्छतेच्या प्रश्नावर जिल्ह्यातील कोणी आमदार आवाज उठविला का? असा सवाल नागरिकांमधून केला जात आहे. महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना अहिल्यानगर महापालिकेचे आयुक्तपदाचा पदभार स्वीकारून एक वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेला आहे. या एक वर्षाच्या काळात आयुक्त यशवंत डांगे यांनी प्लॅस्टिक पिशवी वापरणाऱ्यांवर कारवाई, शहर स्वच्छ मोहीम, विनापरवाना फ्लेक्सवर कारवाई, कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई या सारखे अनेक कारवाई मोहीम राबविली.

तसेच विविध योजना तयार करून त्यांची अंमलबजावणी करण्याची घोषणा केली. प्रत्यक्षात आयुक्तांनी राबविलेले नवनवीन उपक्रम व कारवाईची मोहीम थोड्या कालावधी पुरती राहिली. त्या कारवाई व उपक्रमाची प्रसिध्दी मिळविल्यानंतर चार ते आठ दिवसात ती कारवाई मोहीम व उपक्रम गुंडाळण्यात आल्याचे दिसून येत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शहरात प्लॅस्टिक पिशव्या वापरणार्यांवर कारवाई झालेली नाही.

तसेच शहरात विना परवाना फ्लेक्स मोठ्या प्रमाणात उभारण्यात आलेले आहे. परंतु, त्यावरही कोणती कारवाई गेल्या चार ते पाच महिन्यात झालेली नाही. शहरातील अनेक भागात तर झाडलोट होत नाही. महापालिका प्रशानाकडे तक्रार केल्यानंतर झाडलोट होते. त्यानंतर पुन्हा कधीच झाडलोट होत नाही. गेल्या अनेक दिवसांपासून शहरात कचरा संकलनासाठी घंटागाड्या येत नाही. याबाबतही नागरिकांनी मनपा प्रशासनाकडे तक्रारी केलेल्या आहेत. त्यावरही महापालिकेचे आयुक्त डांगे यांनी कारवाई केलेली नाही. त्यामुळे शहर सध्या अस्वच्छ दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. नागरिकांना कर भरूनही अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पालिकेचा कारभार सुधारण्यासाठी डॅशिंग अधिकाऱ्याची महापालिकेला गरज असल्याचे मत नागरिकांमधून व्यक्त केले जात आहे.




### प्रसिध्दी मिळवून घेणारा अधिकारी नको

स्वतःची प्रसिध्दी मिळवून घेणारा अधिकारी शहराला नको आहे. जनतेचे प्रश्न सोडविणारा अधिकारी शहरात असणे गरजेचे आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व लोक प्रतिनिधींनी एकत्र येवून शहराचा विकास करून जिल्ह्याचा लौकीक वाढेल, असा अधिकारी आणण्यासाठी प्रयत्न करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

### ... आता कामाचा अधिकारी आणा

शहराचे आ. संग्राम जगताप शहराचा विकास करण्यासाठी अहोरात्र झटत आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळेच शहरात रस्ते चकाचक झालेली आहे. अजूनही शहरात विकास कामे होत आहे. मात्र त्यांच्या या विकास कामांना महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून ग्रहण लागत आहे. महापालिकेचे अधिकारी सध्या प्रसिध्दीच्या मागे धावत आहेत. आपण किती कार्यक्षम आहोत, आपण किती कामे करतो, हे दाखविण्याचा प्रयत्न सध्या महापालिकेच्या प्रशासकांचा सुरु आहे. प्रत्यक्षात कामे किती आहे, हे शहरातील अस्वच्छतेसह पाणी, स्वच्छता मोहीम, विनापरवाना फ्लेक्सचा शहराला झालेल्या विळख्यावरून दिसून येत आहे.

### ... मनपात डॅशिंग अधिकारी हवा?

डॅशिंग अधिकारी आले, तरच महापालिकेतील कर्मचाऱ्यांना शिस्त लागेल. अन् शहराचा विकास होईल. यासाठी जिल्ह्याचे भूषण व मुख्य केंद्र असलेल्या शहराचा विकास करण्यासाठी जिल्ह्यातील सर्वच लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन पावले उचलावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## संमिश्र

### भारतात वेगाने पसरतोय नवा कोरोना प्रकार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली :** कोरोनाच्या नवीन प्रकार एक्सएफजीने पुन्हा एकदा चिंता वाढवली आहे. आतापर्यंत देशात २०६ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. सर्वाधिक प्रकरणे महाराष्ट्रात (८९), त्यानंतर पश्चिम बंगाल (४९), तामिळनाडू, केरळ, गुजरात आणि दिल्लीमध्ये आहेत. केवळ मे महिन्यात १५९ नवीन प्रकरणे नोंदवली गेली.

मध्य प्रदेशातही एक्सएफजी प्रकार वेगाने पसरत आहे. भोपाळ येथील एम्सच्या अहवालानुसार, येथील ६३% पेक्षा जास्त प्रकरणे एक्सएफजी प्रकाराची आहेत. येथील एकूण ४४ नमुन्यांपैकी २८ नमुन्यांमध्ये प्रकाराची ओळख पटली आहे.

### यूपीत शाळेत जाण्यासाठी वार्षिक ६ हजार भत्ता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**उत्तर प्रदेश :** उत्तर प्रदेश सरकार आता दररोज शाळेत जाणाऱ्या मुलांना दरवर्षी ६ हजार रुपये भत्ता देणार आहे. ज्या मुलांना त्यांच्या घरापासून ५ किमीच्या परिसरात सरकारी शाळा नाही ते हा भत्ता मिळण्यास पात्र असतील. या योजनेच्या मदतीने, राज्य सरकार शाळांमध्ये मुलांची उपस्थिती वाढवण्याच्या ध्येयाकडे काम करेल. सोनभद्र आणि बुंदेलखंड या ६ जिल्ह्यांसाठी ही प्रमुख योजना सुरू केली जाईल. या भागात मुलांना शाळेत पोहोचणे ही एक मोठी समस्या आहे.

### दिल्लीत चार मजली इमारत कोसळली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली :** शनिवारी सकाळी दिल्लीतील वेलकम परिसरात एक चार मजली इमारत कोसळली. इमारतीत १० जणांचे कुटुंब राहत होते. पोलिसांनी सांगितले की, आतापर्यंत सात जणांना ढिगाऱ्यातून बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अजूनही तीन ते चार जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची शक्यता आहे.




पावसाने कोणीही खुश नसेल पण आपण खूप खुश आहोत.

# होवू द्या 'दूध का दूध आणि पाणी का पाणी'

## आ. रोहित पवार: ईडीने दाखल केले आरोपपत्र

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** आ. रोहित पवार यांच्याविरोधात मनी लॉड्रिंग प्रतिबंधक कायदा,२००२ अंतर्गत पुरवणी आरोपपत्र मुंबईतील विशेष न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. यावर बोलताना ते म्हणाले की, मी कुणाचे आणि काय ऐकले नाही म्हणूनच माझ्या विरोधात अंमलबजावणी संचालनालयाने



कारवाई केली, हे सर्वश्रुत आहे. यापेक्षा अधिक काही सांगण्याची गरज नाही, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी ईडीच्या कारवाईवर आपली भूमिका मांडली आहे.

रोहित पवार यांनी आपल्या एक्स वरून एक भावनिक ट्वीट करत ईडीच्या कारवाईवर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, ईडीचे अधिकारी बिचारे आदेशाचे धनी आहेत. त्यांनी फक्त आलेल्या आदेशाचे पालन केले आणि आता आरोपपत्रही दाखल केले आहे.

रोहित पवारांनी पोस्ट करत म्हटलंय की, कुणाचं आणि काय ऐकलं नाही म्हणून माझ्या विरोधात ईडीने कारवाई केली हे जगजाहीर आहे,याबाबत अधिक सांगण्याची गरज पान ४

### ... आता न्यायालयीन सुनावणीला वेग

बारामती ॲग्रो लिलाव प्रक्रिया रिंग करून, स्पर्धक कंपन्यांना बाद करण्यात आले आणि बारामती ॲग्रोशी संबंधित व्यक्तींना फायदेशीर स्थितीत आणल्याचा आरोप आहे. या प्रकरणात ईडीने ५० कोटी रुपयांहून अधिक मालमत्ता जप्त केली असून, अलीकडेच मुंबईतील विशेष पीएमएलए न्यायालयात पुरवणी आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणात आता न्यायालयीन सुनावणीला वेग येण्याची शक्यता आहे.

# शिवरायांचे १२ किल्ले जागतिक पटलावर

## जागतिक वारसा स्थळ दर्जामुळे जगभरातून पर्यटक येणार : फडणवीस

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिल्याच्या निर्णयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला आहे. युनेस्कोच्या या निर्णयामुळे शिवरायाचे १२ किल्ले जागतिक पटलावर आलेत. या निर्णयामुमळे पर्यटनाला चालना तर मिळेलच, पण सोबतच महाराजांचा गौरवशाली इतिहासही वैश्विक पातळीवर नेण्यासाठी आपल्याला फायदा होणार आहे, असे ते म्हणालेत. यावेळी शक्तिपीठ महामार्गाला होणारा विरोध कालांतराने थांबेल, असा विश्वासही व्यक्त केला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात फडणवीस यांनी युनेस्कोने शिवरायांच्या १२ किल्ल्यांना दिलेल्या जागतिक वारसा स्थळाच्या दर्जावर समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, सर्वप्रथम जगभरातील शिवप्रेमींचे मी अभिनंदन करतो. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले हे पान ४

### सरकार सर्वच पातळीवर प्रयत्नशील

किल्ले रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी व जिंजी या १२ किल्ल्यांना आता जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळाला आहे. १२ पैकी ११ किल्ले महाराष्ट्रात आहेत, तर १ जिंजी हा तामिळनाडूमध्ये आहे. या किल्ल्यांचे वेस्टर्न घाट, समुद्र, जंगल आदी नैसर्गिक विविधतेत कसे स्थापत्य तयार करण्यात आले.

गड किल्ले ही आपली संस्कृती परंपरा जतन करण्यासाठी शासन स्तरावरून सर्व उपाय योजना केल्या जात असताना आता जागतिक वारसा स्थळांमध्ये या किल्ल्याची नोंद झाल्याने किल्याच्या संरक्षणासाठी आणि पावित्र्य राखण्याची जबाबदारी आता अधिक वाढली.

**–ना. राधाकृष्ण विखे पाटील**

# जयंत पाटीलच प्रदेशाध्यक्ष : आ. आव्हाड

## उपमुख्यमंत्री अजित पवार गटाकडून आताच ऑफर सुरू?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असल्याची बातमी काल सकाळी वृत्तवाहिन्यांनी दाखवली. तसेच आमदार शशिकांत शिंदे हे प्रदेशाध्यक्ष म्हणून पदग्रहण करणार असल्याचीही बातमी दाखविण्यात आली.

खुद्द शशिकांत शिंदे यांनी काही वृत्तवाहिन्यांशी संवाद साधत मंगळवारी (१५ जुलै) यावर निर्णय होणार असल्याचे सांगितले. मात्र आता पक्षाचे



वरिष्ठ नेते जितेंद्र आव्हाड यांनी एक्सवर पोस्ट करत अद्याप जयंत पाटीलच प्रदेशाध्यक्षपदी असल्याचे स्पष्ट केले. तसेच खोडसाळ बातम्या माध्यमात पसरविल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. दरम्यान अजित पवार गटाकडून जयंत पाटील यांना पक्षात येण्याची ऑफरही देण्यात आली.

वृत्तवाहिन्यांनी जयंत पाटील यांच्या नाराजीच्या बातम्या चालविल्यांतर जितेंद्र आव्हाड यांनी काही वेळापूर्वी एक्सवर पोस्ट टाकून नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले. जयंत पाटील हे प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यांच्या राजीनाम्याच्या बातम्या प्रसारीत होणे, हा निव्वळ खोडसाळपणा आहे. पक्ष एका पान ४

### ... ते सोडणार नाहीत : आ. पवार

दरम्यान जयंत पाटील हे भाजपात जाणार असल्याच्या चर्चांना उधाण आलेले असताना रोहित पवार यांनी मात्र ही शक्यता फेटाळून लावली. ते म्हणाले, जयंत पाटील हे घाबरणारे नेते नाहीत. राजीनामा दिला म्हणून ते पक्ष सोडून जातील, ही शक्यता वाटत नाही. सत्तेसाठी ते आजवर ज्या विचारांशी प्रामाणिक राहिले, ते विचार ते सोडणार नाहीत. एखादे मंत्रिपद मिळावे म्हणून ते पवार साहेबांना किंवा विचारांना सोडून पळून जातील, असे मला वाटत नाही.

# गोपीनाथ मुंडेंच्या तिसऱ्या लेकीची राजकारणात एन्ट्री

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बीड :** भाजपचे दिवंगत नेते आणि माजी केंद्रीय मंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या कन्यांपैकी मोठ्या असलेल्या पंकजा मुंडे आणि डॉ. प्रीतम मुंडे या दोघी राजकारणात सक्रीय आहेतच. आता त्यांची धाकटी कन्या यशश्री मुंडेही राजकीय प्रवासाची सुरुवात करीत आहे. बीडमधील वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या निवडणुकीतून त्या आपल्या राजकीय कारकिर्दीला प्रारंभ करत आहेत.

पेशाने वकील असलेल्या यशश्री मुंडे यांनी वैद्यनाथ बँकेच्या संचालक पदासाठी निवडणूक अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे मुंडे कुटुंबातील तिन्ही कन्या आता सार्वजनिक जीवनात सक्रिय झाल्या आहेत.



यशश्री यांच्या उमेदवारीची चर्चा गेल्या काही दिवसांपासून बीडच्या राजकीय वर्तुळात सुरू होती. अखेर त्यांनी अधिकृतरित्या निवडणूक अर्ज दाखल करत आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली आहे.

वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या एकूण १७ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडत आहे. आज, १२ जुलै, हा अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता. आतापर्यंत तब्बल ७२ नामनिर्देशक अर्ज दाखल करण्यात आले आहेत. अर्जांची छाननी १४ जुलै रोजी होणार असून, अर्ज मागे घेण्याची मुदत १५ ते २९ जुलै दरम्यान ठेवण्यात आली आहे. या निवडणुकीत माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांचाही सहभाग असून, महिला प्रवर्गातून कोणताही पान ४

# ... तर महायुतीत येणाऱ्यांचे स्वागत करा

## जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे पदाधिकाऱ्यांना आवाहन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहराच्या विकासाला निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. झोपडपट्टीमुक्त शहर करून घरकुल योजनेची प्रभावी अंमलबजावणी आपल्याला करायची आहे. विकास प्रक्रीयेत श्रीरामपूर आता थांबणार नाही. जनतेच्या मनातील सरकारची विकासाची गती पाहून महायुतीत येणाऱ्यांचे स्वागत करा, असे आवाहन जलसंपदा तथा पालक मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

नगरपरिषद कार्यालयात मंत्री विखे पाटील यांनी अधिकारी पदाधिकारी आणि




नागरिकांची समन्वय बैठक घेवून समस्या जाणून घेतल्या. बैठकीमध्ये नागरीकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत संबधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी दिले. शासन योजनेच्या लाभार्थीना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

बैठकीनंतर संवाद पान ४

### ... चक्क शिवरायांच्या नावावर राजकारण?

श्रीरामपुरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा शहरात उभा राहावा, म्हणून अनेक वर्षाची प्रतिक्षा आता संपली आहे. सर्वानी त्याचे स्वागत केले पाहिजे. पण महाराजांच्या नावावर राजकारण करणाऱ्यांचे आश्चर्य वाटते. अनेक लोक मला भेटले. मात्र शिवाजी महाराजांच्या स्मारकामुळे शहराचे वैभव वाढले आहे. याची जाणीव ठेवली पाहिजे. आणखी एखादे स्मारक उभारण्यासाठी तुम्ही प्रयत्न करा, असेही पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले.

शेती महामंडळाच्या जमीन घरकुलासाठी उपलब्ध करून दिल्याने घरकुलांचा मोठा प्रकल्प भविष्यात उभा राहणार आहे. नॉर्दन ब्रॅन्च कॅनॉल वरील सर्व अतिक्रमण काढण्यात येणार असल्याने तिथे कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. जलसंपदा विभागाचे अधिकारी पाहणी करून गेले असल्याने नगरपालिकेने सुध्दा याबाबत कडक धोरण घ्यावे.

**– राधाकृष्ण विखे पाटील**, पालकमंत्री

# वाघ गावात शिरताच अलार्म वाजणार

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती; ९०० एआय कॅमेरे बसवणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नागपूर :** राज्यात वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षावर उपाय म्हणून व्याघ्र प्रकल्पांमध्ये एआय आधारित ९०० कॅमेरे बसवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांच्या उपस्थितीत मार्वल कंपनीसोबत सरकारचा करार झाला आहे. वाघ गावांकडे आल्यास अलार्म



वाजणार असून ग्राम स्थांना वेळीच इशारा मिळणार आहे. या यंत्रणेमुळे जीवितहानी टळणार आहे. याबाबत चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये वाघांचे प्रमाण वाढले आहे. शिकारीच्या शोधात हे वाघ मानवी वस्तीकडे येत असतात. यामुळे गेल्या काही काळात वाघाने अचानक हल्ला केल्याने जंगली भागात काही पान ४

# मानवी जीवनात गुरूला अनन्यसाधारण महत्त्व : मुळे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**भिंगार** : आपल्या गुरूंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजात आपलं स्थान निर्माण करावे असे प्रतिपादन स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनी ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष प्रमोद मुळे यांनी केले.

श्रीमती अॅबट मायादेवी गुरुदित्ताशाह हायस्कूल भिंगार या ठिकाणी गुरुपौर्णिमेचे आयोजन करण्यात आलेल्या प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य प्रमोद तोरणे होते.

यावेळी प्रमोद मुळे, गणेश दाणी, रमेश वराडे, सुनील तरवडे, श्रीपाद मुंगी, शिवप्रसाद काळे, राम घुले, विद्यालयाचे प्राचार्य प्रमोद तोरणे, मुख्याध्यापक नारायण अनभुले, पर्यवेक्षिका कविता शिंदे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलन संपन्न झाले. आमदार आशुतोष काळे यांचे नगर कार्यालय प्रमुख गणेश दाणी यांनी विद्यार्थ्यांना आपला देश, आई-वडील, गुरु यांना कधीही विसरू नये. तरच जीवनाला अर्थ आहे, हे समजून सांगितले.

स्वामी विवेकानंद ट्रस्ट भिंगार यांच्या वतीने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. प्रास्ताविकामध्ये विद्यालयाचे प्राचार्य प्रमोद तोरणे यांनी विद्यार्थ्यांकडून गुरुदक्षिणा म्हणून जीवनात कधीही व्यसन करणार नाही ही शपथ घेतली. यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त भाषणे करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पद्मजा सुरकुटला यांनी केले. तर आभार गणपत करवते यांनी मानले.

# 'पर्यावरण'साठी माजी सैनिकांचा पुढाकार कौतुकास्पद

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया; १०० वडाची झाडे भगवानगडावर लागवडीसाठी रवाना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीसाठी जय हिंद फाउंडेशनने घेतलेला पुढाकार दिशादर्शक आहे. देश संरक्षणाच्या कर्तव्यानंतर पर्यावरणाच्या संरक्षणासाठी माजी सैनिकांचा पुढाकार कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले

वृक्षारोपण व संवर्धनाचा संदेश देत शहरातून जय हिंद फाऊंडेशनच्या वतीने वृक्ष फेरी काढण्यात आली. या वृक्ष फेरीमध्ये दहा गाड्यांमध्ये



१०० वडाची झाडे, गाडीला राष्ट्रीय तिरंगा ध्वज लाऊन फेरी काढण्यात आली. तर फेरी मधील वडाची झाडे भगवानगड या ठिकाणी लागवडीसाठी रवाना करण्यात आली.

वृक्ष फेरीचे प्रारंभ जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते झाला. यावेळी निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गिते, वन विभागचे सहाय्यक वनसंरक्षक जी.पी. मिसाळ, ए.आर. दिघे, वनपरिक्षेत्र अधिकारी अरुण

पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीसाठी जय हिंद फाऊंडेशनने घेतलेला पुढाकार दिशादर्शक आहे. देश संरक्षणाच्या कर्तव्यानंतर पर्यावरणाच्या संरक्षणासाठी माजी सैनिकांचा पुढाकार कौतुकास्पद आहे. वृक्षारोपणाचे मोठे उद्दिष्ट समोर ठेऊन कार्य सुरु असून, या कार्यात जय हिंदचा देखील हातभार लागणार आहे.

**– डॉ. पंकज आशिया, जिल्हाधिकारी**

साबळे, अनिल शेलार, लेखापालन ए.आर. शिरसाट, सुधिर लाड, फाऊंडेशनचे शिवाजी पालवे, शिवाजी गर्जे, संभाजी शिरसाठ, सचिन दहिफळे, निळकंठ उल्हारे, अर्जुन आव्हाड, पोलीस कॉन्स्टेबल इरफान शेख, सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ औटी, पप्पू ढाकणे, म्हातारदेव नेहरकर, किरण ढवळे, वैभव जावळे, संदिप पालवे, अतुल नेटके, भास्कर पालवे आदी उपस्थित होते.१०० वडाची झाडांची फेरी अहिल्यानगर वरून करंजी-पाथर्डी मार्गे भगवानगड या ठिकाणी लागवडीसाठी रवाना करण्यात आली.

## कांद्याची चोरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शेतातील घराजवळ असलेल्या कांद्याच्या चाळीतून अज्ञात चोरट्याने ४८ हजार ४०० रुपये किमतीचा कांदा चोरुन नेला. ही घटना नगर तालुक्यातील शिंगवे नाईक येथील हनुन वाडी येथे १० जुलै रोजी सायंकाळी ६ ते ११ जुलै रोजी सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान घडली.

# विरोधकांना त्यांच्या भाषेत उत्तर देवू

## समीर बिल्डर ; एमआयएमचा निवडणूकी संदर्भात जिल्हा मेळावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महाराष्ट्रात एमआयएम पक्षाला बळकट करण्यासाठी राज्याची कोर कमेटीने राष्ट्रीय अध्यक्ष खा. असदुद्दीन ओवेसी आणि प्रदेशाध्यक्ष माजी खा. इम्तियाज जलील यांच्या आदेशाने महाराष्ट्राचा दौरा सुरु केला आहे. पश्चिम महाराष्ट्राची सुरवात नगर येथून करण्यात आली. नगर येथे ही जिल्ह्याचा कार्यकर्ता मेळावा झाला.



यावेळी पक्षाचे आजी-माजी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्राचे प्रदेश महासचिव समीर बिल्डर, अतिक अहमद, युसुफ पुंजानी, शाफीउल्ला काझी, सैफ पठाण यांनी आढावा बैठकित जिल्ह्यात होणाऱ्या निवडणूका लढवता येईल यावर चर्चा केली.

नगर जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अशरफी म्हणाले की, जेव्हा आम्ही एमआयएमचे काम सुरु केले. तेव्हा लोक कोणताही प्रतिसाद देत नव्हते. परंतु आज चांगल्या चांगल्या नेते आणि आजी-माजी लोक प्रतिनिधी एमआयएमसोबत येण्यास तयार आहे. लवकरच तुम्हाला चांगली बातमी देणार असल्याचेही पक्ष श्रेष्ठींना सांगितले. येणाऱ्या महानगर पालिका निवडणूक असो की जिल्ह्यातील कोणतीही निवडणूक असो एमआयएम आपल्या हिस्स्याचे लोक प्रतिनिधी निवडून आणतील.

यावेळी डॉ. परवेज अशरफी, तौसीफ शेख, अमीर खान, युसुफ शेख, डॉ. अन्सार, शहाबाज शेख, सरफराज सय्यद, इम्रान देशमुख, इस्माईल शेख, शम्स शेख, नासीर शेख, आवेज शेख, नदीम तांबोळी, शोएब पठाण, सज्जाद शेख आदी उपस्थिती होते.

## मोटारसायकलची घरासमोरुन चोरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : घरासमोर रस्त्याच्या कडेला हॅंडेल लॉक करुन लावलेली होंडा कंपनीची मोटारसायकल (क्र. एम एच १६ बी एक्स ८७६०) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही घटना नगर तालुक्यातील दरेवाडी येथे ७ जुलै रोजी रात्री दीड ते पहाटे चार वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात संदीप मोहनीराज आवटी (वय ५१, रा. दरेवाडी ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चोरट्याविरुद्ध बी एन एस ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, शहरात दुचाकी चोरीचे प्रमाण वाढले असून पोलिस प्रशासनोन रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी नागरीकांकडून होत आहे.

# मोकाट फिरणाऱ्या आरोपींवर कारवाई करा

## रिपब्लिकन सेनेच्या पदाधिकाऱ्यांचे पोलीस अधीक्षक यांना निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२ जणांच्या सोन साखळ्या व खिशातील पकिटांवर डल्ला मारणारे चोरटे १ वर्ष होऊनही मोकाटच फिरत असल्याच्या निषेधार्थ रिपब्लिकन सेनेच्या वतीने पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांची भेट घेऊन सर्व पुरावे देण्यात आले.



यावेळी रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे समवेत तक्रारदार संदीप ठोंबरे, सचिन शिंदे, सुनील गट्टानी, विकास रणदिवे, संजय ताकवले, विवेक विधाते, सत्यवान नवगिरे, सुनिता शिंदे, नेहा जावळे, बेबीताई टकले आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, दि. ४ जून २०२४ रोजी शिर्डी व नगर लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी एमआयडीसी येथील वखार महामंडळाच्या गोडाऊनमध्ये झाली. निवडणूक निकाल ऐकण्यासाठी मतमोजणी केंद्राबाहेर मोठया प्रमाणात गर्दी होती. निवडून आलेल्या उमेदवाराची विजयी मिरवणूक निघाली. या मिरवणूकित मोठी गर्दी होती, याच गर्दीचा फायदा घेत चोरट्यानी १२ जणांच्या सोन्याच्या चेन व खिशातील पैशाची पाकिटे चोरली गेली.

ही बाब तक्रारदारांच्या लक्षात आल्यावर तक्रारदारानी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केले व आरोपी राजेंद्र वसंत शिंदे (रा.पाथर्डी) याला संशयित गुन्हेगार म्हणून पोलिसांच्या ताब्यात घेतले त्यानंतर संशयित गुन्हेगारांचे चैन कापताना व त्याच्या हातात चैन असलेला फोटो व व्हिडीओ स्वरूपातील पुरावे एमआयडीसी पोलिसांना सादर करण्यात आले.

सदर घटनेचा तपास लवकर होत नसल्याने एमआयडीसी पोलिसां कडून स्थनिक गुन्हे शाखेकडे गुन्हा वर्ग करावा, असे पत्र पीडिताकडून जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात देण्यात आले होते.

# गुरुंच्या मार्गदर्शनानेच यशाचा प्रकाश मिळतो

## बाळकृष्ण सिद्दम; श्री मार्कंडेय विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात



गुरु म्हणजे केवळ अध्यापक नसून जीवनाला दिशा देऊन यशाकडे घेऊन जाणारा मार्गदर्शक असतो. गुरुंच्या मार्गदर्शनानेच यशाचा प्रकाश मिळतो. आजच्या बदलत्या काळात विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी शिक्षकांचे योगदान मोलाचे ठरत आहे.

**– बाळकृष्ण सिद्दम**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून गुरुंबद्दलची कृतज्ञता व्यक्त करत गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमामध्ये गरजू विद्यार्थ्यांना गणवेश आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी माजी शिक्षिका भारती सानम, संस्थेचे विश्वस्त राजेंद्र म्याना, मुख्याध्यापक संदीप छिंदम, उपमुख्याध्यापक पांडुरंग गोने, पर्यवेक्षक प्रमोद चन्ना, तसेच शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी सुहास बोडखे उपस्थित होते.

भारती सानम म्हणाल्या की, भारतीय संस्कृतीमध्ये गुरुचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. गुरुंच्या माध्यमातून अनेक व्यक्ती यशोशिखरावर पोहचली असल्याचा इतिहास आहे.

# शांतता-सुव्यवस्थेसाठी पोलीसांची भूमिका महत्त्वाची : अॅड. अनुराधा येवले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहर आणि ग्रामीण भागात एकाच वेळी आलेले मोहरम आणि आषाढी एकादशी हा धार्मिक सण शांतता, सुव्यवस्था आणि सौहार्दपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी पोलीस दलाची भूमिका महत्त्वाची ठरली. याबद्दल प्रातिनिधिक स्वरुपात शहराचे विभागीय पोलीस उपाधीक्षक अमोल भारती यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी अॅड. अनुराधा येवले, ड. अमोल अकोलकर, ड. रामदास घावटे, तसेच सामाजिक कार्यकर्ते, महिला पोलीस उपस्थित होते.

मोहरम व आषाढी एकादशी हे दोन महत्त्वाचे सण एकाच दिवशी आल्यामुळे प्रशासनासमोर मोठे आव्हान होते. परंतु पोलिसांनी अतिशय शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध कामगिरी केली. कोणताही अनुचित प्रकार घडू न देता दोन्ही सण अत्यंत शांततेत पार पडले, ही खरोखरच कौतुकास्पद असल्याचे येवले म्हणाल्या.

# आगामी निवडणुकांमध्ये बसपाचा स्वबळाचा नारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शाहू, फुले, आंबेडकरी विचार झुगारुन जातीयवादी पक्ष संविधानाला आघात पोहचवित आहे. जातीयवादी शक्ती व पक्षांना शह देण्यासाठी बहुजन समाज पार्टी सर्व बहुजन समाजाला बरोबर घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सामोरे जाणार आहे. सत्तेसाठी विचारांशी तडजोड करणाऱ्यांबरोबर न जाता स्वबळावर सर्व निवडणुका लढविल्या जाणार असल्याची पक्षाची भूमिका प्रदेश महासचिव डॉ. हुलगेश चलवादी यांनी व्यक्त केली.

बहुजन समाज पार्टीच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक शासकीय विश्रामगृह येथे पार पडली. यावेळी चलवादी बोलत होते.



या बैठकीसाठी प्रदेश सचिव रामचंद्र जाधव, पुणे झोन बामसेफ संयोजक रामटेके, अनिल त्रिपाठी, जिल्हा अध्यक्ष सुभाष कांबळे, जिल्हाध्यक्ष उमाशंकर यादव, जिल्हा प्रभारी सुनील ओव्हळ, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, राजू शिंदे, महिला जिल्हाध्यक्ष अंजुम शेख, प्रकाश अहिरे, फिरोज शेख आदींसह जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरुंशिवाय जीवन खडतर : भूषण गुंड

## केडगावात गुरुपौर्णिमेला ज्येष्ठ शिक्षकांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : ३५ ते ४० वर्षापासून अविरतपणे ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या ज्येष्ठ शिक्षक-शिक्षिकांचा केडगावात गुरुपौर्णिमेला सन्मान करण्यात आला. या सत्काराने गुरुजन भारावून गेले. श्री गणेश दत्त देवस्थान ट्रस्ट आणि संदीप कोतकर युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने भूषण अशोक गुंड यांच्या पुढाकारातून ज्येष्ठ शिक्षकांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



शिक्षक हा आदर्श समाजाचा पाया आहे. शिक्षकांच्या माध्यमातून भावी पिढी घडत असून, त्यांचा सन्मान होणे गरजेचा आहे. जीवनाला दिशा देण्याचे कार्य गुरु करत असतात. गुरुंशिवाय जीवन खडतर आहे.

**– भूषण गुंड**

अंबिकानगर येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वती पूजन करण्यात आले. गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी स्वानंद महाराज जोशी यांच्या प्रवचन रंगले होते. त्यांनी प्रवचनातून गुरुचे महत्त्व विशद केले.

उपाध्यक्ष बाबासाहेब राशिनकर यांनी प्रास्ताविकात समाज घडविण्याचे कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान होण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे स्पष्ट केले. नंदकुमार पोळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी डॉ. शरद कोलते, सागर सातपुते, बापूसाहेब सातपुते, मारुती चोबे, आनंद पाठक, संजय बोरगे, शिरीष होंडे, नंदकुमार पोळ, शरद आचारी, दिलीप शेजुळ, अजित पवार, शारदा शेजुळ, वसुधा देशपांडे, प्रतिमा कुलकर्णी, गौरी ठाणेकर, संजय निक्रड, प्रमोद कुलकर्णी, राजेश देशपांडे आदी उपस्थित होते.

## तरुणाला मारहाण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : आम्हाला शिवीगाळ का केलीस अशी विचारणा करुन मोटारसायकल स्वारासह अन्य दोघांनी तरुणास मारहाण केली.

# सदस्यांनो, महिला अत्त्याचार मुक्तीसाठी काम करा

## स्नेहालय संस्थेचे संचालक प्रविण मुत्याल यांचे आधारगट सदस्यांना आवाहन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : आधारगट सदस्यांना महिला अत्याचारविरोधी लढ्याचे महत्त्व पटवून दिले. महिलांवरील अन्याय थांबवायचा असेल, तर आपल्या प्रत्येकाने एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे, महिलांनी सक्षम झाले पाहिजे. महिलांनी सन्मानाने जीवन जगले पाहिजे. आज समाजात पुरुषप्रधान संस्कृती आहे. परंतु महिलांनी सुद्धा पुरुषांच्या खांद्याला खांदा



देऊन काम केले पाहिजे. गाव महिला अत्याचार मुक्त झाले पाहिजे, असे प्रतिपादन स्नेहालय संस्थेचे संचालक प्रविण मुत्याल यांनी केले.

महिलांवरील अत्याचाराला आळा घालण्यासाठी आणि समाजात जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने स्नेहालय संचलित स्नेहाधार प्रकल्पातील आधारगटातील सदस्यांना सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी प्रविण मुत्याल, विद्या घोरपडे, अमर पाटील, रुपाली सोयम आदी उपस्थित होते. या कार्यशाळेत विविध गावातील आधारगटांचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यशाळेच्या शेवटी सहभागी सदस्यांनी महिला अत्याचारविरोधी लढ्यात सक्रियपणे सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमामुळे समाजात सकारात्मक बदल घडून येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा शिंदे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार कोमल मोकळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंदाकिनी मोकळे, सिद्धार्थ दाभाडे, प्रतीक्षा अम्बोरे, कावेरी रोहकले आदींनी परिश्रम घेतले.

# माव्याच्या अड्ड्यावर पोलिस पथकाची कारवाई

## तीन लाख किंमतीचा सुगंधित मावा व तंबाखू जप्त, दोन आरोपी अटकेत



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : महाराष्ट्रात बंदी असलेल्या मावा, सुगंधित तंबाखू व तत्सम पदार्थांच्या साठवणूक, उत्पादन व विक्रीवर कारवाई करत जिल्हा विशेष पोलीस पथकाने पाथर्डी शहरात मोठी धाड टाकली. या तीन कारवाईत सुमारे २ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन आरोपींना अटक, तर दोन आरोपी फरार आहेत.

पाथर्डी शहरातील चिंचपूर रोडवरील ‘अक्षय पान टपरी’ येथे अभिजीत मिनिनाथ लांडे (२९, आनंदनगर, पाथर्डी) नावाच्या इसमाकडून मावा विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावर पथकाने छापा टाकला.

छाप्यात ८ किलो तयार मावा (किंमत ५६००/-) जप्त करण्यात आला असून, लांडे याने पुढील चौकशीत सुगंधित मावा आणि तंबाखू अक्षय इधाटे, सुनिल व राहुल सानप यांच्याकडून घेत असल्याची कबुली दिली.लांडेच्या माहितीवरून, पथकाने इंदिरानगर परिसरातील अक्षय गणेश इधाटे याच्या पत्र्याच्या शेडवर छापा टाकून तेथून ६०,८००/- किंमतीचा सुगंधित तंबाखू व मावा जप्त केला. यानंतर लांडे याने पथकाला तनपुरवाडी येथील दिनकर कुटे यांच्या विटभट्टीजवळील शेड येथे घेऊन गेले, जिथे सुनिल बाबासाहेब सानप (३६, शिरसाटवाडी) उपस्थित आढळला. त्या ठिकाणी तपासणीदरम्यान १० किलो मावा, १२ पुडे सुगंधित तंबाखू व एक मावा तयार करण्याचे मशीन (किंमत ५५,०००/-) असा एकूण ६६,८००/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.या तीन ठिकाणांवर करण्यात आलेल्या कारवायांमध्ये दोन लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही संपूर्ण कारवाई पूर्ण करून पथकाने अभिजीत लांडे व सुनिल सानप या दोन आरोपींना पाथर्डी पोलिस ठाण्यात आणले व सर्व मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला. दुसरे दोन आरोपी अक्षय गणेश इधाटे व राहुल अर्जुन सानप हे घटनास्थळी उपस्थित नव्हते व सद्य:स्थितीत फरार आहेत. त्यांचा शोध सुरू आहे.

### आरोपींना दोन दिवसांची कोठडी

दोन्ही अटक आरोपींना शनिवारी पाथर्डी न्यायालयात हजर केले असता २ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उपनिरीक्षक विलास जाधव हे करत आहेत. तपासासाठी जप्त मुद्देमालापैकी प्रत्येक नमुन्यावर पोलीस व पंचांचे सह्य असलेली लेबले लावून सीए तपासणीसाठी राखीव ठेवण्यात आले आहे.

# शिवकालीन वारशाचे जागतिक गौरवात रूपांतर : विवेक कोल्हे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे प्रतीक असलेले महाराष्ट्रातील बारा किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाल्याबद्दल संपूर्ण महाराष्ट्रात आनंदाचे वातावरण असून, या ऐतिहासिक निर्णयाचे कोल्हे साखर कारखान्याचे अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी मनःपूर्वक स्वागत करत भारतीय शासनाचे आणि विशेषतः महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन व आभार मानले आहेत.

या निर्णयामुळे शिवकालीन शौर्य, स्वाभिमान आणि सर्जनशीलतेचा वारसा आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचेल आणि नव्या पिढीला आपल्या इतिहासाचा अभिमान वाटेल, असे युवानेते विवेक कोल्हे यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले. त्यांनी नमूद केले की, हे केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण भारतासाठी गौरवाचे क्षण आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले हे किल्ले केवळ लढाया किंवा प्रशासनाचे केंद्र नव्हते, तर धैर्य, दूरदृष्टी आणि राष्ट्रनिर्मितीच्या प्रेरणेची जिवंत उदाहरणे होती. जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाल्यामुळे या किल्ल्यांच्या संवर्धनासाठी अधिक निधी, तांत्रिक सहाय्य आणि जागतिक पातळीवर पर्यटनाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# रथोत्सव शांततेत पार पडण्यासाठी उपाययोजना करा : रोहिणी घुले

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कर्जत** : संपूर्ण राज्यामध्ये धाकटी पंढरी अशी ओळख असणारे कर्जत व येथील ग्रामदैवत थोर संत सद्गुरु गोदड महाराज यांची रथयात्रा कामिका एकादशी दिनांक २१ या दिवशी भरणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या यात्रेसाठी राज्यभरातून लाखोंच्या संख्येने भाविक येतात. यावेळी येणाऱ्या सर्व भाविकांची व नागरिकांची चांगली व्यवस्था व्हावी व यात्रा शांततेने पार पडावी, यासाठी सर्व प्रशासकीय प्रमुखांनी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात असे नगराध्यक्ष रोहिणी सचिन घुले बोलताना म्हणाल्या.

गोदड महाराज यांच्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर कर्जत पंचायत समितीच्या सभागृहामध्ये शांतता कमिटीची बैठक संपन्न झाली. यावेळी मेघनाथ पाटील, नगराध्यक्ष रोहिणी घुले, माजी नगराध्यक्ष नामदेव राऊत, उपनगराध्यक्ष संतोष मेहत्रे, सचिन घुले, तहसीलदार गुरु बिराजदार, पोलीस निरीक्षक सोपानराव शिरसाठ, गटविकास अधिकारी अजिंक्य, सूर्यवंशी, बप्पासाहेब धांडे, काकासाहेब धांडे, सुरेश ख्रिस्ती, पंढरीनाथ काकडे, ऋषिकेश धांडे,दत्तात्रय शिंदे,अनिल गदादे, प्रदीप पाटील, नारायण नेटके सर्व विभागाचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

### सर्वांनी सूचनांचे पालन करावे

यात्रा काळात गोदड महाराज यात्रा कमिटी, कर्जतचे ग्रामस्थ यासह स्थानिक तालुका प्रशासन यांनी सूचना केलेल्या प्रमाणे निश्चित केलेल्या जबाबदारीने पार पाडत कायदा-सुव्यवस्थेच्या नियमानुसार रथोत्सव उत्साहात साजरा करावा, असे आवाहन तहसीलदार गुरू बिराजदार यांनी केले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत आत्मा मालिक प्रथम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे, आयोजित पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये आत्मा मालिक सेमी इंग्लिश मिडीयम गुरुकुल कोकमठाणचे १२१ विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये चमकले असून आत्मा मालिक राज्यात प्रथम स्थानी आहे. यामध्ये इयत्ता ८ वी चे ११३ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळविले असून राज्यात १०० पेक्षा जास्त विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये येणारी आजपर्यंतची एकमेव शाळा ठरली आहे. इयत्ता ५ वी चे ८ विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये चमकले आहे.



पाच विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळविले असून यामध्ये श्रेयश नलावडे २७४ गुणांसह राज्यात ११ वा तर जिल्हयात प्रथम, श्रेयश भवर २७२ गुणांसह राज्यात १३ वा तर जिल्हयात द्वितीय, धनश्री रक्ताटे २७२ गुणांसह राज्यात १३ वा तर जिल्हयात तृतिय, श्रीतेज इंगोले २६८ गुणांसह राज्यात १६ वा तर जिल्हयात चतुर्थ, सिध्दार्थ पगारे २६८ गुणांसह राज्यात १६ वा तर जिल्हयात पाचव्या स्थानी आहे.

अहिल्यानगर जिल्हयातून इयत्ता ८ वी, ग्रामिण मधून राज्यगुणवत्ता यादीत चमकलेले पाचही विद्यार्थी आत्मा मालिकचे आहे. आजपर्यंत ६८८ विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्याचा नवा विक्रम गुरुकुलाने साकारला आहे. आत्मा मालिक शैक्षणिक संकुल हे विद्यार्थ्यांचे सर्वगुणसंपन्न सर्वांगसुंदर व्यक्तीमत्व घडविण्यासाठी सदैव कटिबध्द असल्याची प्रतिक्रीया अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी यांनी दिली. या विद्यार्थ्यांना प्राचार्य निरंजन डांगे, विभाग प्रमुख अनिल सोनवणे, सचिन डांगे, सागर अहिरे, रविंद्र देठे, रमेश कालेकर, बाळकृष्ण दौंड, मिना नरवडे, पर्यवेक्षक नयना शेटे, गणेश रासने, सुनिल पाटील, नितीन अनाप यांचे मार्गदर्शन लाभले.

# तहसीलच्या बारकोडचा गैरवापर

## खोटा दाखला देणाऱ्या ऑपरेटरवर गुन्हा

**जनता आवाज वृत्तसेवा**




**शिर्डी** : तहसील कार्यालयाने आधीच इतर व्यक्तीसाठी दिलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याचा बारकोड वापरून दुसऱ्या व्यक्तीसाठी खोटा दाखला तयार करत शासनाची फसवणूक केल्याच्या प्रकरणी पिंपळवाडी ग्रामपंचायत ऑपरेटरविरुद्ध शिर्डी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी रवींद्र नारायण देशमुख (वय ५२, महसूल सहाय्यक, राहाता तहसील कार्यालय) यांनी तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीनुसार, दिनांक ११ जुलै रोजी सायंकाळी ४ वाजता ज्ञानदेव कंस वाकचौरे (वय २३, रा. पिंपळवाडी) नावाचा युवक त्यांच्या कार्यालयात आला. त्याने मिळालेला उत्पन्नाचा दाखला तपासून पाहण्याची विनंती केली. दाखल्यावरील बारकोड क्रमांक तपासला असता तो दाखला प्रत्यक्षात नवनाथ आनारसे या व्यक्तीसाठी दिनांक १९ मे २०२५ रोजी तहसीलदारांनी दिलेला असल्याचे समोर आले.

याबाबतची माहिती देशमुख यांनी तहसीलदार अमोल मोरे यांना दिली. तहसीलदारांनी माहितीची शहानिशा करून तपास केला असता त्यांना सदर दस्तऐवज खोटा आढळून आला. त्यासाठी तहसील कार्यालयाच्या बारकोडचा गैरवापर करण्यात आला आहे.

पुढील तपासात स्पष्ट झाले की, ग्रामपंचायत पिंपळवाडीचा ऑपरेटर प्रविण गोरक्षनाथ रोठे (वय २७) याने नवनाथ आनारसे यांना दिलेल्या दाखल्यावरील बारकोड व डिजिटल सहीचा वापर करून तोच दाखला बनावट स्वरूपात ज्ञानदेव वाकचौरे याला दिला. हा प्रकार लक्षात आल्यानंतर रवींद्र देशमुख यांनी शिर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत फसवणूक व अन्य कलमांखाली प्रविण रोठेविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# लोकअदालत सप्ताहाचे आयोजन करण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**




**अहिल्यानगर** : सहकार जिल्हा उपनिबंधक यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्यात पतसंस्था व सहकारी बँका यांच्या कर्जदारांच्या समस्या, वाद, तंटे निर्मूलन करण्यासाठी जिल्हानिहाय सहकार लोकअदालत सप्ताहाचे आयोजन करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

राज्यात खूप मोठ्या प्रमाणावर सहकारी पतसंस्थांचे जाळे आहे व उपरोक्त पतसंस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर लहान-मोठ्या स्वरुपाची आर्थिक कर्जे ग्रामीण भागातील गरजू शेतकरी वर्गास वितरीत केली जातात. परंतु कर्जदारास पैशाची गरज असते, तो कर्ज घेताना व कर्जाच्या व्याजाच्या टक्केवारीचा कुठलाही विचार न करता घाईत कर्ज घेतो व नंतर नियमित व्याज व चक्रवाढ व्याजाच्या पतसंस्थांच्या सावकारी, पठाणी वसुलीच्या व दंड व्याजाच्या चक्रात अडकून पडतो. याचा गैरफायदा पतसंस्था चालक घेतात व मुद्दल रक्कम कर्जापेक्षा चौपट व काही काही प्रकरणात १०० पट जास्त व्याज आकारतात असे पाहण्यात आले आहे.

कर्जदार हा संस्थेचे कर्ज घेतलेले असते व त्याचे कर्जाबाबतचे संरक्षण अधिकारी काय आहेत, हे माहीत नसल्याने तो आत्महत्या करण्याकडे वळतो, ही अत्यंत गंभीर बाब आहे. तरी पतसंस्थांच्या व सहकारी मल्टीस्टेट बँकांच्या गैरप्रकाराला आळा घालण्याच्या दृष्टीकोनातून राज्यात दर वर्षी जिल्हानिहाय सहकार लोकअदालत घेण्याचा उपक्रम राज्य पातळीवर घेण्यात यावा, अशी मागणी नितीन थोरात यांनी केली आहे.

# कार्यकारी संचालकपदी सोमनाथ बोरनारे

## काळे कारखान्याच्या संचालक मंडळाची बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोळपेवाडी** : सहकार क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या कार्यकारी संचालकपदी सोमनाथ शिवाजीराव बोरनारे यांची एकमताने नियुक्ती करण्यात आली आहे. कारखान्याचे मार्गदर्शक व ज्येष्ठ संचालक माजी आमदार अशोकराव काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व कारखान्याचे चेअरमन आ. आशुतोष काळे यांच्या अध्यक्षतेखाली कारखान्याच्या संचालक मंडळाच्या पार पडलेल्या बैठकीत हि नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांसाठी ५० कार्यकारी संचालकांचे नवीन पॅनल तयार करण्यासाठी राज्याच्या सहकार विभागाकडून १८ एप्रिल २०२२ ला निर्णय घेण्यात आलेला होता. या ५० कार्यकारी संचालकांच्या पॅनलमधील अनुभवी उमेदवाराची कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती करणे साखर आयुक्तालयाच्या आदेशानुसार बंधनकारक होते. या पॅनलमध्ये कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या अकौंट विभागातील सोमनाथ शिवाजीराव बोरनारे यांचा देखील समावेश होता.

सोमनाथ बोरनारे मागील तेरा वर्षापासून कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या सेवेत असून मागील चार वर्षापासून फायनान्स मॅनेजर म्हणून आपली जबाबदारी उत्कृष्ठपणे सांभाळत होते. त्यांच्या सेवेचा अनुभव लक्षात घेवून संचालक मंडळाने त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करून त्यांची कारखान्याच्या कार्यकारी संचालकपदी एकमताने नियुक्ती केली.

# सरकारकडून मदत मिळवण्यासाठी पाठपुरावा करू

## माजी मंत्री थोरात; पवार, पिंजारी कुटुंबीयांची भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**



**संगमनेर** : भूमिगत गटार दुर्घटनेत मृत पावलेल्या अतुल पवार व जावेद पिंजारी यांच्या कुटुंबीयांची काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी भेट घेऊन सांत्वन केले आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करून या दोन्ही कुटुंबांना तातडीने जास्तीत जास्त मदत मिळवून देऊ असे ते म्हणाले.

कोल्हेवाडी रोड येथे भूमिगत गटार दुर्घटनेमध्ये मृत पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांची माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी भेट घेतली यावेळी समवेत मा. आ. डॉ. सुधीर तांबे, युवा काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात, शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, विश्वासराव मुर्तडक आदी उपस्थित होते.

थोरात म्हणाले की, झालेली घटना ही अत्यंत दुर्दैवी आहे. नगरपालिका प्रशासनाचा निष्काळजीपणा, तसेच काम अपूर्ण असताना आणि जोडणी अनाधिकृत जोडणी या युवकांना स्वच्छतेसाठी पाठवण्याची गरज नव्हती. झालेली घटना ही हृदय हेलकावणारी असून अतुलला वाचवण्यासाठी जावेद हा पुढे सरसावला. त्या दोघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला आहे.या दोन्ही कुटुंबीयांना शासन स्तरावरून जास्तीत जास्त मदत मिळून देण्यासाठी मुख्यमंत्री व सरकारकडे आपण पाठपुरावा करून यांना तातडीने मदत मिळवून देऊ असे ते म्हणाले.

# काम सुरू झाल्याने खा. लंके यांचे उपोषण मागे

## प्रकल्प अधिकाऱ्यांचे लेखी आश्वासन; अखेर प्रशासन नमले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे महाव्यवस्थापक तथा प्रकल्प संचालक वसंत पंदरकर यांच्या निर्देशानंतर ठेकेदाराने नगर-मनमाड रस्त्याचे काम सुरू केल्याने तसेच हे काम कालबध्द वेळेत पुर्ण करण्याचे लेखी आश्वासन पंदरकर यांच्या वतीने देण्यात आल्याने खा. लंके यांनी शुक्रवारपासून सुरू केलेले बेमुदत आंदोलन शनिवारी सायंकाळी मागे घेण्यात आले.

खा. लंके यांना देण्यात आलेल्या लेखी आश्वासनात नमुद करण्यात आले आहे की, या आंदोलनाची दखल घेत आम्ही या रस्त्याच्या ठेकेदाराला काम सुरू करण्याबाबत निर्देश दिले आहेत. या निर्देशानुसार ठेकेदाराने शनिवारी राहुरी फॅक्टरी येथे ड्रेनेजचे काम, शनिशिंगणापुर फाटा येथे मिलिंगचे काम तसेच मौजे देहरे येथे अंडरबायपासचे काम सुरू करण्यात आलेले आहे. मौजे कणगर आणि मौजे पिंपरी निर्मळ येथे प्लॅन्ट उभारणी आणि यंत्र सामग्री व लॅबोरेटरी उभारण्यात आली असल्याचे या लेखी आश्वासनात नमुद करण्यात आले आहे.

नगर-मनमाड रस्त्याच्या कामासाठी खा. नीलेश लंके हे गेल्या काही वर्षांपासून पाठपुरावा करत आहेत. खा. लंके यांनी यासंदर्भात केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केल्यानंतर या कामाची पुन्हा निविदा प्रसिध्द होऊन एप्रिल महिन्यात प्रत्यक्ष कार्यारंभ आदेशही देण्यात आला. मात्र



दोन महिने उलटूनही हे काम सुरू न झाल्याने खा. लंके यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. लंके यांनी निवेदन देऊनही कार्यवाही न झाल्याने शुक्रवार दि. ११ जुलै पासून खा. लंके यांनी बेमुदत उपोषण सुरू केले होते.

शनिवारी आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी राहुरी, राहता, कोपरगांव येथील विविध गावांचे सरपंच तसेच इतर पदाधिकारी, शिर्डी येथील पदाधिकारी तसेच व्यापारी यांनी आंदोलनस्थळी भेट देत खा. लंके यांच्या आंदोलनास पाठिंबा दर्शविला. रस्त्याच्या दुरावस्थेमुळे बाधित झालेल्या गावांव्यतीरिक्त जिल्ह्याच्या इतर भागांमधील नागरिक, पदाधिकारीही आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलनास पाठिंबा दिला होता.

### खा. लंके यांच्या सहकाऱ्यांकडून कामाची पडताळणी

खा. नीलेश लंके हे आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने शुक्रवारी सायंकाळी प्रकल्प संचालक वसंत पंदरकर यांनी ठेकेदारास शनिवारी काम सुरू करण्याचे निर्देश दिले होते. त्यामुळे शनिवारी सकाळपासून खा. लंके यांचे सहकाऱ्यांनी या रस्त्यावर प्रत्यक्ष काम सुरू झाले किंवा नाही याची पडताळणी केली. सहकाऱ्यांनी दिलेल्या अहवालानंतर खा. लंके यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यास मान्यता दर्शविली.

## संपादकीय

# ई व्होटींगच्या निमित्ताने...

जगात वीस वर्षांपूर्वी ई-व्होटिंग प्रणाली सुरू झाली असताना भारतात तिचा प्रयोग मर्यादित पातळीवर का होईना सुरू व्हायला वीस वर्षे लागली. भारतात मोबाईल आणि इंटरनेट वापराचे प्रमाण अजून कमी असले, तरी डिजिटल क्रांतीच्या या युगात ई-व्होटिंग फार अशक्य नाही. ईव्हीएमवर होत असलेले आरोप पाहता 'मोबाईल व्होटिंग' किती सुरक्षित हा प्रश्न असला, तरी घरून मतदान करणे आणि त्यासाठीचे ॲप वापरणे अवघ्या काही टक्क्यांचा अपवाद वगळता शक्य आहे, हे बिहारच्या प्रयोगातून दिसले आहे. भारतात मतदानाप्रती उदासीनता आपल्या देशात नवीन समस्या नाही. त्यावर उपाय म्हणून 'ई-व्होटिंग' हा प्रभावी, सोईचा उपाय ठरू शकतो. देशात पहिल्यांदाच बूथवर होणाऱ्या मतदानापेक्षा मोबाईल ॲपद्वारे होणाऱ्या मतदानात जास्त मतदान झाले. तंत्रज्ञानाच्या युगात 'ई-व्होटिंग' नवीन नाही. विविध कंपन्या त्यांच्या उत्पादनांबद्दल जनतेचे मत जाणून घेण्यासाठी हे करत आहेत. कोरोना संसर्गाच्या काळात आपण नेत्यांच्या डिजिटल रॅली पाहिल्या. अशा परिस्थितीत आपण ई-मतदानाच्या दिशेने पुढे का जाऊ शकत नाही, असा प्रश्न पडतो. बिहारचा प्रयोग त्याची सुरुवात मानता येईल. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत वृद्ध आणि शारीरिकदृष्ट्या अपंग लोकांना त्यांच्या घरी जाऊन मतदान करण्याची सुविधा देण्यात आली होती. आपल्याकडे पोस्टल मतदानाचीही तरतूद आहे. 'ई-व्होटिंग' हे या सुविधांचे विस्तारित आणि आधुनिक रूप म्हणता येईल. 'ई-व्होटिंग' टप्प्याटप्प्याने लागू केले जाऊ शकते. यामुळे मतदारांचा वेळ आणि श्रम वाचतीलच; शिवाय लोकशाहीचा महायज्ञ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निवडणुकांमध्ये अधिकाधिक लोकांना सहभागी होता येईल, भारतातील मतदार तांत्रिकदृष्ट्या 'ई-व्होटिंग'ची प्रक्रिया समजून घेण्याइतके सक्षम नाहीत, असा युक्तिवाद निश्चितच केला जाईल. नोंदणीपासून ते ओळख पटवणे आणि मोबाईल ॲपवर लॉगिन करणे या प्रक्रियेतही गैरवापर आणि फसवणूक शक्य आहे, अशी शंका व्यक्त केली जाते; परंतु प्रत्येक समस्येवर उपाय शोधता येतो.


ईव्हीएमद्वारे मतदान सुरू झाले, तेव्हाही अनेक प्रश्न उपस्थित केले गेले होते. हे प्रश्न अजूनही उपस्थित केले जात आहेत. देशातील निवडणुकांसाठी वर्षानुवर्षे वाढणारा खर्च वाचवण्यासाठी आणि टप्प्याटप्प्याने मतदान प्रक्रिया थांबवण्यासाठी 'ई-व्होटिंग' हा एक चांगला उपाय असू शकतो. ऑनलाइन मतदान करणे अशक्य नाही. योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून ते नियोजनबद्ध पद्धतीने अंमलात आणण्याची गरज आहे. तंत्रज्ञान कमी शिक्षित आणि वृद्ध लोकही कसे आत्मसात करतात, हे बिहारमधील पहिल्या 'ई-व्होटर' महिलेच्या उदाहरणावरून स्पष्ट होते.

बिहार राज्य निवडणूक आयोगाने देशात प्रथमच 'ई-व्होटिंग'चा वापर करून नगरपालिका निवडणुका आणि पोटनिवडणुका आयोजित करून इतिहास रचला. यामध्ये, निवडणुकीसाठी नोंदणी केलेल्या ८०.६० टक्के मतदारांनी घरातून आणि राज्याबाहेरून मोबाईलद्वारे मतदान केले. पोटनिवडणुकीत ५८.३८ टक्के मतदारांनी मोबाईलद्वारे मतदान केले. सरासरी ६९.४९ टक्के मतदान मोबाईलद्वारे झाले. निवडणुकीत फक्त ५४.६३ टक्के मतदारांनी ईव्हीएमवर मतदान केले. युरोपीय देश एस्टोनियामध्ये 'ई-व्होटिंग'द्वारे २००५ मध्ये मतदान घेण्यास सुरुवात झाली. त्यानंतर जगात इतरत्र हळूहळू 'ई-व्होटिंग' प्रणाली स्वीकारली जात आहे. 'ई-व्होटिंग'मुळे बूथवर न जाणाऱ्यांनांनाही मतदान करण्याची संधी मिळेल. गर्भवती महिला, वृद्ध, अपंग किंवा असाध्य आजारांनी ग्रस्त लोकांना या प्रक्रियेद्वारे मतदान प्रक्रियेत आणता येईल; शिवाय नोकरीनिमित्त बाहेरगावी असलेल्यांना मतदानासाठी प्रवास करायला लावण्याची गरज भासणार नाही. मतदानाच्या दिवशी कार्यालयांना सुटी दिली जात असली, तरी तिचा पर्यटनासाठी उपयोग करून मतदानाकडे पाठ फिरवणाऱ्यांनाही चाप बसेल. कार्यालयांना सुटी न देता मतदान वाढवता येईल. देशाच्या एक दिवसाच्या उत्पादकतेचे नुकसान त्यामुळे टळणार आहे. पूर्वी अनेकदा असाध्य रुग्णांना मतदानासाठी खाटांवर आणले जात होते. आता 'ई-व्होटिंग' मुळे ती वेळच येणार नाही. ई-व्होटिंग करणारे बिहार हे पहिले राज्य आहे. आयोगाचे उद्दिष्ट सुमारे ५० टक्के मतदारांना या सुविधेशी जोडणे असे होते. या कल्पनेअंतर्गत, तंत्रज्ञानाच्या मदतीने 'ई-व्होटिंग' प्रक्रिया राबविली जाते. जे लोक पूर्वी बूथवर जाऊ शकत नव्हते, ते आता घरून मतदान करू शकतात. 'ई-व्होटिंग'ची सुविधा मिळविण्यासाठी, सर्वप्रथम मतदाराने त्याच्या मोबाईल क्रमांकासह नोंदणी करावी लागते. नोंदणीच्या वेळी सुरक्षेशी संबंधित संमती द्यावी लागते. त्यानंतर, त्याची ओळख पटविण्यासाठी व्यक्तीचा फोटो काढला जातो. मतदार कार्डवर नोंदवलेल्या फोटोशी तो जुळवला जातो. या प्रक्रियेत प्रगत 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे मतदार जिवंत असल्याची खात्री केली जाते. सेल्फी आणि मतदार कार्डमधील फोटो एकत्र केला जातो. या तंत्रज्ञानाचे वैशिष्ट्य म्हणजे मतदार कार्डवरील फोटो अनेक वर्षे जुना असला, तरीही 'एआय' तंत्रज्ञानाद्वारे ओळख पटवणे शक्य होते.

'ई-व्होटिंग'च्या वेळी ज्या मोबाईल नंबरची नोंदणी केली जाते, तो सक्रिय असावा एवढीच अट असते. त्याच मोबाईल फोनवरून मतदान करता येईल. या नवीन प्रणालीचा प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिक, अपंगत्व, गंभीर आजारांनी ग्रस्त, गर्भवती महिलाआणि स्थलांतरित कामगारांना फायदा होईल. ई-मतदानाच्या या नावीन्यपूर्णतेमुळे, बिहारमधील निवडणूक प्रक्रिया अधिक समावेशक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. या उपक्रमामुळे लोकशाही मजबूत होणार नाही, तर मतदानाचा टक्का वाढण्यासही मदत होऊ शकते. बिहारला बऱ्याच काळापासून स्थलांतराची समस्या भेडसावत आहे. समाजशास्त्रज्ञांच्या मते, येथे कमी मतदान होण्याचे हे एक प्रमुख कारण आहे. या कारणास्तव, राज्य निवडणूक आयोग या उपक्रमाकडे मतदानाचा टक्का वाढवण्याचे मोठे साधन म्हणून पाहत आहे; पण तळागाळात काम करणारे सामाजिक कार्यकर्ते यावर प्रश्न उपस्थित करत आहेत. मोबाइल फोन महिला आणि वृद्धांच्या आवाक्यात नाहीत. बहुतेक महिलांकडे स्मार्टफोन नाहीत. सामान्य फोन आहेत. याशिवाय, नोंदणी प्रक्रियेत वाचन आणि लेखनदेखील समाविष्ट आहे. प्रशिक्षणाशिवाय महिला आणि इतर घटकांसाठी हे कठीण आहे.

# सिरिंज हल्ल्यांच्या भयाखाली





**दखल**

**- शंतनु चिंचाळकर**

जगात दहशतवादाबद्दल चर्चा सुरू असताना फ्रान्समध्ये अलिकडेच अशा दहशतीची भीती व्यक्त केली गेली, जी यापूर्वी कधीही पाहिली किंवा ऐकली नव्हती. या दहशतीला 'सिरिंज टेरर' असे नाव देण्यात आले आहे. एका संगीत महोत्सवादरम्यान अचानक लोकांना सिरिंजने टोचल्याच्या बातम्या येऊ लागल्या. पोलिस आणि वैद्यकीय सेवा महोत्सवात पोहोचल्या तेव्हा १४५ जणांना सिरिंजने टोचल्याचे आढळून आले. काय होते हे प्रकरण?

फ्रान्समध्ये 'फेटे दे ला म्युझिक' हा संगीत महोत्सव साजरा केला जातो. दर वर्षी २१ जून रोजी उन्हाळ्याचा सर्वात मोठा दिवस येतो तेव्हा संपूर्ण पॅरिस संगीत मैफिलीत बदलते. रस्त्यांचे कोपरे, रेस्टॉरंट्स, उद्याने, मेट्रो स्टेशन आदी ठिकाणी लोक संगीताच्या जादूमध्ये मग्न असतात. अलिकडेच फ्रान्समध्ये संगीताचा हा महोत्सव साजरा केला जात होता. संगीत महोत्सवाच्या कार्यक्रमाच्या एक दिवस आधी सोशल मीडियावर बरीच चर्चा होती. त्यानंतर या संगीत महोत्सवादरम्यान एक अतिशय विचित्र आणि संस्मरणीय घटना घडली. अचानक लोकांना सिरिंजने टोचल्याच्या बातम्या येऊ लागल्या. पोलिस आणि वैद्यकीय सेवा महोत्सवात पोहोचल्या तेव्हा १४५ जणांना सिरिंजने टोचल्याचे आढळून आले. सिरिंज हल्ल्यातील १४ जणांनी त्यांच्या शरीरात सुन्नपणाची तक्रार केली. यामुळे फ्रान्समध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले.

फ्रान्सच्या सुप्रसिद्ध महिला हक्क कार्यकर्त्या अब्रीजया यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले होते की, सोशल मीडियावर महिलांना लक्ष्य करण्याचे आवाहन करण्यात आल्याचे संदेश अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर येत आहेत. पॅरिससह टूर्स, रुएन आणि एव्हरेक्स सारख्या शहरांमधून १५-१६ वर्षांच्या मुलींपासून अनेक महिलांवर सिरिंजने हल्ले करण्यात आल्याच्या तक्रारी आल्या. इथे अनेक महिलांनी अधिकाऱ्यांनी सांगितले की गर्दीत असताना त्यांना सुई टोचल्यासारखे वाटत होते. त्यानंतर त्यांची प्रकृती बिघडली. फक्त टूर्समध्ये १३ महिलांनी सिरिंजचे हल्ले झाल्याची तक्रार केली. पॅरिसमधील या घटनेसह फ्रान्समधील इतर तीन शहरांमधूनही अशाच प्रकारच्या बातम्या आल्या, जिथे महिलांनी सार्वजनिक कार्यक्रमांदरम्यान सिरिंजसारख्या वस्तूने टोचले गेल्याची तक्रार केली. या महिलांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अब्रीजच्या या पोस्टमुळे असा संशय व्यक्त केला जात आहे की हा सुई हल्ला महिलाविरोधी मानसिकतेचा परिणाम असू शकतो. पॅरिससह चार शहरांमध्ये सुईने वार करण्याच्या या घटना हे वेड्यांचे काम होते की त्यामागे एखादी संघटित टोळी किंवा दहशतवादी संघटना होती, याची चौकशी चालू आहे. देशाच्या विविध भागांमधून अशा घटना घडल्यानंतर स्थानिक पोलिस सतर्क झाले, फ्रान्समध्ये या उत्सवादरम्यान ३७० हून अधिक लोकांना अटक करण्यात आली. त्यापैकी सुमारे ९० जणांना पॅरिसमध्येच अटक करण्यात आली. तथापि, पॅरिसचे पोलिस प्रमुख लॉरेंट नुनेज म्हणाले की, उत्सवादरम्यान मोठ्या प्रमाणात शांतता बिघडवण्याचे षडयंत्र रचले जात होते. या घटनेमुळे फ्रान्समधील सार्वजनिक कार्यक्रमांच्या सुरक्षा व्यवस्थेपुढे गंभीर प्रश्न उपस्थित होतात. पोलिस तपास सुरू आहे आणि अधिकाऱ्यांना आशा आहे की अटक केलेल्या आरोपींच्या चौकशीच्या आधारे इतर चौकशी केली जाईल. तसेच, सिरिंजमध्ये वापरल्या जाणाऱ्या पदार्थाचीही चौकशी केली जात आहे.

फ्रान्समध्ये गर्दीच्या उत्सवादरम्यान सिरिंज हल्ला होण्याची ही पहिलीच वेळ नाही. २०२२ च्या सुरुवातीलाही असे हल्ले झाले होते. त्यानंतर सरकारने नाईट क्लब, पार्ट्या, थिएटर किंवा गर्दीच्या उत्सवात सहभागी होणाऱ्या लोकांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले होते. सिरिंज हल्ले गर्दीच्या ठिकाणी केले जातात. फ्रान्समध्ये झालेल्या या हल्ल्यात इंजेक्शनमध्ये औषध होते की नाही याची पुष्टी झालेली नाही. हल्ल्यातील काही पीडितांना विषारी चाचणीसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, असे फ्रेंच सरकारने सांगितले. ज्यामागील हेतू अनेकदा चोरी, लैंगिक शोषण किंवा अपहरण असतो. एखाद्याला बेशुद्ध करून फायदा घेण्याचा हेतू देखील या हल्ल्यांमागील प्रमुख कारण आहे. बऱ्याचदा सिरिंजमध्ये असे औषध भरलेले असते, जे लैंगिक हल्ल्यांमध्ये वापरले जाते. हल्लेखोर गर्दीचा फायदा घेत सिरिंजने हल्ला करतात. पीडिता बेशुद्ध झाल्यानंतर ते चोरी, बलात्कार किंवा अपहरण असे गुन्हे करतात. अशा हल्ल्यांमध्ये बहुतेकदा महिलांना लक्ष्य केले जाते.

२०१५ मधील बटाक्लान कॉन्सर्ट हॉल हत्याकांडासह फ्रान्समध्ये वारंवार प्राणघातक जिहादी हल्ले झाले आहेत. यात अतिरेक्यांनी कॉन्सर्टमध्ये जाणाऱ्यांवर गोळीबार केला आणि तासन्‌तास ओलीस ठेवले. पण २०२२ पासून सुरू झालेल्या या विचित्र प्रकारच्या हल्ल्यातून दहशतवादी काय साध्य करत आहेत, हा प्रश्न आहे. लोकांना एकत्रितपणे अशा प्रकारे सुया टोचल्या जातात तेव्हा काही प्रश्नही निर्माण होतात, जे जाणून घेणे खूप महत्वाचे आहे. २१ जून रोजी फ्रान्समध्ये झालेल्या सिरिंज हल्ल्यात, इंजेक्शनमध्ये अमली पदार्थ होते की नाही याची पुष्टी झालेली नाही. या संपूर्ण प्रकरणात कारवाई करत पोलिसांनी आतापर्यंत १२ जणांना अटक केली आहे. अँगोलेममध्ये चार संशयितांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर सुमारे ५० लोकांना लक्ष्य केल्याचा संशय आहे. मेट्झमध्येही दोघांना अटक करण्यात आली आहे. येथे एका अल्पवयीन मुलावर सिरिंजने हल्ला करण्यात आला होता. अटक केलेल्यांपैकी एकाने यापूर्वीही हिंसक घटनांमध्ये सहभाग घेतला आहे.

ज्या जगात अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची सहज उपलब्धता होते, तंत्रज्ञानातील विध्वंसक सायबर जगताची प्रगती होते, बॉम्ब बनवण्यापासून शिरच्छेद करण्यापर्यंतच्या मुद्द्यांवर अमर्यादित साधनांची उपलब्धता असते, जिथे १९४५ मध्ये म्हणजे ८० वर्षापूर्वी विद्ध्वंस करण्यासाठी अणुबॉम्बचा वापर केला जातो, तिथे हे सिरिंज हल्ले ही म्हणावी तर किरकोळ बाब आहे आणि ज्या घटकांनी एकत्रितपणे दहशतवादाविरुद्ध युद्ध छेडणे गरजेचे आहे, ते संपूर्ण आंतरराष्ट्रीय समुदायास गंभीर धोका असूनही, त्याच्याशी एकत्रितपणे कसे लढायचे यावर एकमत होण्यापासून दूर आहेत. या सिरिंज हल्ल्यांसंदर्भात पडणारा पहिला मोठा प्रश्न म्हणजे यामागे संघटित गट आहे की हे वेगवेगळ्या लोकांचे काम आहे. दुसरा मोठा प्रश्न असा आहे की, सुईद्वारे पीडितांच्या शरीरात कोणतेही रसायन टाकण्यात आले होते का आणि जर तसे असेल तर ते रसायन कोणते आहे? तिसरा मोठा प्रश्न असा की या हल्ल्यात बळी पडलेल्या बहुतेक महिला का आहेत?

भारतात गर्दीचा फायदा घेऊन असे सिरिंज हल्ले होऊ लागले आणि त्याद्वारे फसवणूक करणे, लुबाडणे किंवा लैंगिक अत्याचार करणे अशी गैरकृत्ये होऊ लागली तर भयानक परिस्थिती उद्भवेल. १४० कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशामध्ये मोठ्या प्रमाणात वारीसारख्या विविध धार्मिक यात्रा, सण आणि उत्सव साजरे केले जातात. लग्न समारंभ आणि इतरही सांसारिक कार्यक्रम पार पाडले जातात. साधा लग्न समारंभ असला तरी पाच-सहाशे लोकांची गर्दी सहज जमते. अमरनाथ यात्रा, गणेशोत्सव आणि कावड यात्रेसारख्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये तर लाखोंनी आणि दाटीवाटीने गर्दी जमते. अशा कार्यक्रमांमध्ये केवळ अफवा पसरल्याने आणि गर्दी सैरभैर झाल्याने गुदमरून आणि पायदळी तुडवले जाऊन शेकडोजण प्राण गमावतात. त्यामुळे भारतात धार्मिक यात्रा आणि उत्सवामध्ये अशा प्रकारचे हल्ले केले गेल्यास काय परिस्थिती उद्भवू शकेल, त्याला कितीच्या संख्येने लोक लक्ष केले जातील याची कल्पनाही करवत नाही. फ्रान्सची राजधानी पॅरिस आणि इतर दोन शहरांमध्ये घडलेल्या सुई हल्ल्याचे प्रकारांमागे नक्की उद्देश काय होता हे कालांतराने कळेलच, पण यातून दहशतवादाचे एक नवीन साधन नक्कीच जन्माला येईल आणि जनतेला त्याचे परिणामही भोगावेही लागू शकतील. त्यामुळे अशा हल्ल्यांचा तपशिलाने शोध घेतला गेला पाहिजे आणि त्यातून बचावाचे मार्ग आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चीले गेले पाहिजेत.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## होवू द्या 'दूध का दूध आणि पाणी का पाणी'

नाही. ईडीचे अधिकारी

बिचारे आदेशाचे धनी, त्यांनी केवळ आलेल्या आदेशाचे पालन केलं आणि आता आरोपपत्रही दाखल केलं. म्हणजेच तपास पूर्ण झाला असून ज्याची आपण वाट बघत होतो त्या निर्णयाचा चेंडू आता न्यायव्यवस्थेच्या कोर्टात आहे. कारण न्याय देवतेवर माझा पूर्ण विश्वास असून यामध्ये 'दूध दूध आणि पाणी का पाणी' होईलच! विचारांसाठी कितीही संघर्ष करावा लागला तरी माझी तयारी आहे महाराष्ट्राने लाचारीला आणि फितुरीला कधीही थारा दिला नाही आणि संघर्षाला डोक्यावर घेतलंय, हा इतिहास आहे! सत्यमेव जयते,जय संविधान असे ट्विट करताना त्यांनी न्यायव्यवस्थेवर विश्वास असल्याचे म्हटले आहे.

आमदार रोहित पवार यांच्या मालकीची बारामती ॲग्रो कंपनी सध्या अंमलबजावणी संचालनालयाच्या रडारवर आहे. संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड सहकारी साखर कारखाना या कंपनीने खरेदी केला, मात्र या खरेदी-विक्री व्यवहारात गंभीर आर्थिक अनियमितता व बनावट कंपन्यांच्या वापराचे आरोप ईडीकडून करण्यात आले आहेत. बारामती ॲग्रोने बनावट कंपन्यांना हाताशी धरून लिलावात भाग घेतला आणि त्यामुळे कारखाना अत्यंत कमी किंमतीत खरेदी करण्यात आला.

## शिवरायांचे १२ किल्ले जागतिक पटलावर

जागतिक वारसा स्थळ म्हणजे वर्ल्ड हेरिटेज साईट घोषित करण्यासाठी नॉमिनेट केले होते. मोदींकडे देशभरातील ७ वेगवेगळ्या साईट्स गेल्या होत्या. या साईट्सना जागतिक वारसा स्थळ घोषित करण्याची शिफारस केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने पंतप्रधानांकडे केली होती. पण मोदींनी शिवरायांच्या १२ गडकिल्ल्यांना प्राधान्य दिले.

त्याच्या जागा शोधण्यात आल्या. कशाप्रकारे दरवाजे तयार करण्यात आले. प्रत्येक ठिकाणी माची कशा तयार करण्यात आल्या. अशा सर्वच गोष्टी आपण युनेस्कोपुढे ठेवल्या. त्यानंतर युनेस्कोच्या शिष्टमंडळाने भारतात येऊन सर्वच किल्ल्यांना भेट दिली. आपले सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या नेतृत्वात आपले एक शिष्टमंडळ युनेस्कोत पाठवले. त्यांनी तिथे टेक्निकल प्रझेंटेशन केले. त्यानंतर मतदानाचा अधिकार असणारे सर्वच देशांच्या राजदुतांशी आम्ही चर्चा केली.

मी व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांची भेट घेतली. त्यांना मतदानाचा अधिकार असणाऱ्या देशांना विश्वासात घेण्याची विनंती केली. त्यानंतर त्या त्या देशातील राजदुतांना त्या त्या देशातील सरकारांशी संपर्क साधण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानंतर काल वीसही देशांनी आपल्या बाजूने मतदान केले आणि शिवरायांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित झाले. त्यामुळे शिवप्रेमींचा हा एक मोठा विजय आहे.

फडणवीस पुढे म्हणाले, मतदान करणाऱ्या सर्वच देशांनी शिवरायांनी बांधलेल्या या किल्ल्यांचे कौतुक केले. अनेक लोक हे किल्ले बांधताना किती पुढचा विचार करण्यात आला होता हे पाहून आश्चर्यचकितही झाले होते. आता हे किल्ले जागतिक वारसा स्थळ झाल्यामुळे आपले महाराजांचे किल्ले वर्ल्ड मॅपवर आलेत. आता युनेस्कोच्या सगळ्या वेबसाईट्सवर या किल्ल्यांची सर्वच ऐतिहासिक माहिती उपलब्ध होईल. वर्ल्ड टूरिझम मॅपवर हे किल्ले येणार आहेत. युनेस्कोच्या माध्यमातूनही त्या किल्ल्यांच्या ठिकाणी जागतिक वारसा स्थळ म्हणून सगळी माहिती असणाऱ्या कियॉस्क उभे राहणार आहे.

या निर्णयामुळे पर्यटनाला चालना तर मिळेलच, पण त्यासोबतच महाराजांचा गौरवशाली इतिहास वैश्विक करण्यासाठी व वैश्विक पर्यटक आकृष्ट करण्यासाठी आपल्याला फायदा होणार आहे. त्यामुळे भारतीय व मराठी माणसांसाठी हा एक अतिशय महत्त्वाचा दिवस आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## जयंत पाटीलच प्रदेशाध्यक्ष : आ. आव्हाड

नियमानुसार अन् शिस्तीनुसारच चालत असतो.

जितेंद्र आव्हाड यांच्या व्यतिरिक्त शरद पवार गटातून रोहित पवार यांनीही या विषयावर भाष्य केले आहे. ईडीच्या आरोपपत्रात नाव दाखल झाल्याची माहिती बाहेर आल्यानंतर रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली बाजू मांडली. यावेळी त्यांना जयंत पाटील यांच्याबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, शरद पवार, सुप्रिया सुळे आणि जयंत पाटील यांच्या स्तरावर बैठक झाली असून त्यातील निर्णय लवकरच जाहीर होईल.

## गोपीनाथ मुंडेंच्या तिसऱ्या लेकीची राजकारणात एन्ट्री

दुसरा अर्ज न आल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. दुसरीकडे यशश्री मुंडे सामान्य प्रवर्गातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत.

यशश्री मुंडे या वकिलीचे शिक्षण पूर्ण करून अनेक वर्षे परदेशात वास्तव्यास होत्या. अमेरिकेतील प्रतिष्ठित 'कार्नेल युनिव्हर्सिटी'ने त्यांना 'प्रॉमिसिंग आशियाई विद्यार्थिनी' म्हणून गौरवले होते. तशा त्या अद्यापपर्यंत राजकारणात फारशा दिसल्या नव्हत्या. मात्र आता त्या बँक निवडणुकीच्या माध्यमातून प्रथमच जनतेसमोर राजकीय भूमिकेत दिसणार आहेत. त्यांच्या या प्रवेशामुळे बीडच्या राजकारणात नव्या घडामोडींचा सुरुवात होणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## ... तर महायुतीत येणाऱ्यांचे स्वागत करा

साधताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, श्रीरामपूर शहराची राजकीय सामाजिक परीस्थीती आता बदलत आहे. यापुर्वी काय झाले त्याचा विचार न करता विकासाचे राजकारण सुरू झाले आहे.

जलसंपदा विभाग या कॅनॉलच्या बांधकामासाठी निधी देणार असल्याने भूमीगत कॅनॉल करून त्यावर सुशोभीकरणाचे प्रकल्प कार्यान्वित होणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

राज्यात जनतेच्या मनातील सरकार असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून राज्याचा विकास होत आहे. नगरपालिका कार्यक्षेत्रात विकासासाठी निधी देवून पायाभूत सुविधा भक्कम करण्याला प्राधान्य असून लोकांचे जीवनमान उंचावणे हेच महायुती सरकारचे धोरण आहे.

विकासाची प्रक्रीया पाहून अनेकजण आता महायुतीत येत आहेत. त्यांचे स्वागत करायला पाहिजे, असे स्पष्ट करून विकास प्रक्रीयेत जसा महाराष्ट्र थांबणार नाही, तसेच श्रीरामपूर सुध्दा मागे राहाणार नसल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

बैठकीला भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, नानासाहेब पवार, दिपक पठारे, जितेंद्र छाजेड, बाबासाहेब चिडे, संजय फंड, शरद नवले, गणेश मुदगले, केतन खोरे, रवी पाटील, मंजूश्री ढोकचौळे यांच्यासह प्रांताधिकारी किरण सावंत, तहसिलदार मिलींद वाघ, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

## वाघ गावात शिरताच अलार्म वाजणार

लोकांचा जीव गेलेला आहे. यावर उपाय म्हणून राज्यातील व्याघ्र प्रकल्पात एआय बेस तंत्रज्ञयुक्त ९०० कॅमेरे व्याघ्र प्रकल्पात लावले जाणार आहेत.

आपण जगातील आधुनिक घेत आहोत. आता ९०० ठिकाणी कॅमेरे लावले जाणार असून यासोबच अलार्म असतील. ताडोबापासून ते नवेगाव बांध पर्यंत सर्वच जंगल परिसरात हे कॅमेरे असणार आहेत. एखादा वाघ किंवा बिबट्या गावाकडे किंवा खाजगी जागेत दिसेल तेव्हा हे कॅमेरे त्यांना डिटेक्ट करतील आणि तात्काळ गावातील अलार्म वाजेल. ही टेक्नॉलॉजी लोकांचा जीव वाचवण्याकरिता आहे. हे तंत्रज्ञान जंगलात वापरले गेले तर मोठ्या प्रमाणात जीवहानी कमी होईल, असा विश्वास चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

## महानगरपालिका उद्यानातील झाडांची कत्तल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहरातील भवानी -नगर भागातील नागेश्वर मंदिराच्या परिसरात जिजामाता उद्यानात अनेक मोठी झाडे होती व मागील काळात वृक्षारोपण निधीतून लावण्यात आलेली ४७ झाडे सुध्दा होती परंतु ही महानगर पालिकेच्या उद्यान विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी झाडे तोडली आहेत. याबाबत नागरिक संताप व्यक्त करत आहे.

कोणाचीही तक्रार नसताना, कोणालाही अडथळा नसताना इतक्या मोठ्या प्रमाणात छोटी, मोठी झाडे तोडण्याचा प्रकार महानगर पालिकेने केला आहे. याबाबत वृक्ष प्राधिकरण समितीकडून सुध्दा कुठल्याही प्रकारे झाडे तोडण्याची काढण्याची परवानगी घेतलेली नाही. असा आरोप करत याबाबत नितीन भूतारे यांनी हरित लवादाकडे तक्रार केली आहे.

या तक्रारीत त्यांनी म्हंटले आहे की, वसुंधरा महोत्सव अंतर्गत याच ठिकाणी



सुशोभीकरण काम सुरू असून वसुंधरा महोत्सवात 'झाडे जगवा, पर्यावरण वाचवा हा संदेश महानगरपालिका देते आणि एका बाजूला झाडे तोडण्याचे काम करत आहे. उद्यान विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि बांधकाम विभागातील अधिकारी आणि ठेकेदार यांच्यामुळे ही झाडे तोडण्यात आली आहे. वसुंधरा महोत्सवात झाडे जगविण्याऐवजी तोडण्याचे काम महानगर पालिका करत आहे.

### संबंधितांवर गुन्हा दाखल करावा

उद्यान विभागातील अधिकारी तसेच बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर, नागेश्वर मंदिर परिसरातील काम सुरू असलेल्या ठेकेदारावर झाडे तोडल्या प्रकरणी व पर्यावरण धोक्यात आणल्यामुळे कारवाई करण्यात यावी व गुन्हा दाखल करावा अशी मागणी नितीन भुतारे यांनी केली आहे.

## चिकन विक्रेताप्रकरणी लोणी खुर्द येथे कडकडीत बंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** श्रीरामपूर येथे एका कुटुंबाने पाणीपुरवठा करणाऱ्या तलावात मैलामिश्रित पाणी सोडण्याची घटना ताजी असतानाच लोणी येथे एका चिकन विक्रेत्याने चिकनवर लघुशंका करून केलेले चिकन ग्राहकाला विकत असल्याची अतिशय संताप जनक घटना नुकतीच उघडकीस आली आहे.

या अतिशय किळसवाण्या व संताप जनक प्रकाराबद्दल लोणी खुर्द येथील ग्रामस्थांनी आज लोणी खुर्द गाव बंद ठेवून या घटनेचा निषेध केला व निषेध मोर्चा काढून लोणी पोलीस स्टेशन येथे जाऊन डीवायएसपी शिरीष वमने व पीएसआय कैलास वाघ यांना संबंधितांवर कार्यवाही करण्याबाबत निवेदन दिले.

लोणी खुर्द ग्रामपंचायतने या किळसवाण्या घटनेनंतर संबंधित चिकन विक्रेत्याची टपरी तातडीने सील केली व नंतर ती टपरी लोणी खुर्द मधून हटवली. लोणी खुर्दच्या ग्रामस्थांनी संबंधितावर कडक कारवाई करण्याबाबत जोरदार मागणी केली आहे. या प्रकारानंतर लोणी खुर्द ग्रामस्थ लोणी खुर्द व परिसरातील सर्व मास विक्रेत्यांवर कडी नजर ठेवून आहेत.

या प्रकारानंतर काही ग्रामस्थांनी चिकन मटण घेणे व खाणे बंद केले आहे.

# पाणी पुरवठा योजनेचे काम निर्धारीत वेळेत करा

## मंत्री विखे पाटील यांच्या जलसंपदा अधिकाऱ्यांना सूचना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर शहराची गरज लक्षात घेवून महायुती सरकराने वाढीव पाणी पुरवठा योजनेला मंजूरी दिली आहे. १७८ कोटी रुपयांच्या निधीतून कार्यान्वित होणाऱ्या पाणी पुरवठा योजनेचे काम निर्धारीत वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने नियोजन करा, आशा सूचना जलसंपदा तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

श्रीरामपूर शहरातील विविध प्रभागां मधील विकास कामांचा शुभारंभ तसेच लोकार्पण सोहळा मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.




पालिकेच्या वतीने विकसित करण्यात येत असलेल्या शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामाची पाहाणी त्यांनी अधिकारी व पदाधिकारी यांच्या समवेत केली. पाणी योजनेतील नवीन उंच जलकुंभ काम जुन्या टाकीचे बांधकाम पाडल्यानंतर हाती घेण्यात येणार असून, वितरण व्यवस्थेसाठी ५९ कि. मी. पाइप लाईनच्या कामापैकी १७ कि.मी.पूर्ण काम पूर्ण झाले असल्याचे या पाहाणी दरम्यान सांगण्यात आले.

महायुती सरकारने या योजनेच्या कामाला केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून १७८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. २०५१ सालची लोकसंख्या गृहीत २६.३६ दक्ष लक्ष लिटर पाणी प्रतिदीन लागण्याची शक्यता गृहीत धरून योजनेचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सद्य परिस्थितीत जल शुध्दीकरण केंद्राचे आर. सी. सी. डिझाइन प्रमाणे फिल्टर बेडचे खोदकाम पूर्ण झाले असून दगडी सोलिंग व क्रॉकींटचे काम प्रगती पथावर असल्याची माहिती मुख्याधिकारी मच्छींद्र घोलप यांनी सांगितले.

पाणी योजने करीता तलावाचे सर्वेक्षण पूर्ण करून बोअर कोअर चाचणी करण्यात आली आहे. तलावाचे खोलीकरण हे निर्धारीत वेळेत पूर्ण करून आर. सी. सी. काम करण्यात येणार आहे. तलावात आर. सी. सी. काम पूर्ण झाल्यानंतर तळातील मातीचा थर प्लस्टिक शीट वाळूचा थर इत्यादी काम पूर्ण करण्यासाठी दोन महीन्याच्या कालावधी लागणार आहे. योजनेतील सर्व काम कोणत्याही त्रृटी राहाणार नाहीत आशा पध्दतीने पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले. वाढीव पाणी पुरवठा योजना शहराच्या भविष्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण असल्याने सामाजिक भावना लक्षात घेवून योजनेचे काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करण्याची काळजी पालिकेच्या अधिकार्यांनी घेण्याचे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले. भाजपाचे शहराचे अध्यक्ष जिंतेंद्र छाजेड, माजी नगराध्यक्ष संजय फंड, दिपकराव पटारे, केतन खोरे, नानासाहेब पवार, नानासाहेब शिंदे, शरदराव नवले, प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांच्यासह सर्व अधिकारी उपस्थित होते.

# तेलकुडगाव येथे बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद

**जनता आवाज वृत्तसेवा**



**नेवासा** : तालुक्यातील तेलकुडगाव येथील माजी चेअरमन अरुणराव घाडगे यांच्या वस्तीशेजारी लावलेल्या पिंजऱ्यात शुक्रवारी पहाटे चार वाजता बिबट्या जेरबंद झाला. या बिबट्याने या परिसरात अनेक दिवसांपासून धुमाकूळ घातला होता.

माजी चेअरमन अरुणराव घाडगे, कुंडलिक शेटे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांचा बिबट्याने फडशा पाडला होता. त्यामुळे या परिसरात दहशत पसरली होती. अनेक नागरिकांनी या परिसरात दोन बिबटे मुक्त संचार करत असल्याचे बघितले आहे. त्यातील एक बिबट्या जेरबंद झाला असला तरी दुसरा बिबट्या परिसरात अजूनही फिरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

तेलकुडगाव परिसरातील नागरिकांनी बिबट्या बघण्यासाठी मोठी गर्दी केली होती. त्यानंतर वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी येऊन जेरबंद केलेला बिबट्या ताब्यात घेतला. या परिसरात पुन्हा पिंजरा लावून दुसरा बिबट्या तातडीने जेरबंद करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वारीत १४७ रुग्णांची मोफत नेत्र तपासणी

## टेके पाटील ट्रस्टचा उपक्रम : चष्म्यांचे मोफत वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : तालुक्यातील वारी येथील दिवंगत ग्रामपंचायत सदस्य राहुल दादा टेके पाटील यांच्या स्मरणार्थ राहुल दादा मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्ट व तुलसी आय हॉस्पिटल, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने वारी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर नुकतेच उत्साहात संपन्न झाले. या शिबिराच्या अध्यक्षस्थानी कोपरगाव बाजार समितीचे संचालक प्रकाशराव गोर्डे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून गोदावरी दूध संघाचे माजी संचालक उत्तमराव माने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राहुल दादा टेके यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच दीप प्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी उत्तमराव माने, ह.भ.प. विनायक महाराज टेके, डॉ. सर्जेराव महाराज टेके,



### चार वर्षापासून सातत्यपूर्ण नेत्र तपासणी

टेके पाटील ट्रस्टच्या माध्यमातून गेल्या चार वर्षापासून गावात सातत्यपूर्ण मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर राबविण्यात येत आहे. चार वर्षातील हे सातवे शिबिर होते. आत्तापर्यंत पंधराशे पेक्षा जास्त लोकांची नेत्र तपासणी करण्यात आली. यामध्ये ग्रामस्थांसह शालेय विद्यार्थ्यांचा देखील समावेश आहे. तसेच १७५ पेक्षा जास्त लोकांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. तसेच गरजूंना व शालेय विद्यार्थ्यांना मोफत चष्म्याचे वाटप करण्यात आले आहे.

अशोकराव बोर्डे, अशोकराव कानडे, अँड शरद जोशी, वैष्णवी माने यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच प्रकाशराव गोर्डे यांनी अध्यक्षीय भाषण केले. या शिबिराप्रसंगी १४७ नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. यामध्ये १५ नागरिकांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया नाशिक येथे करण्यात येणार आहे. तसेच उपस्थित ३० रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित सर्वच मान्यवर तपासणी करण्यासाठी आलेले नागरिक तसेच मित्र परिवाराला मोफत मदत सेवा केंद्राच्या समन्वयक स्मिता काबरा यांच्यावतीने फराळाचे पाकीट तसेच कान्हेगाव रेल्वे स्थानकाचे स्टेशन मास्तर चंद्रभूषण शर्मा यांच्यावतीने दहा डझन केळीचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रथम लोकनियुक्त सरपंच सतीश कानडे, माजी पंचायत समिती सदस्य अशोकराव कानडे, डॉ. हर्षल पाठक, डॉ. ऋषिकेश रासने, डॉ. रोहित मीना, कैलास भड, दिलीप गडकरी आदी उपस्थित होते.

# रेशन घोटाळा, दोन जणांवर गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : तालुक्यातील खेतेवाडी येथील येणारे धान्य बेकायदेशीरपणे अकोले विकास सेवा सोसायटीच्या गोदामात उतरवताना सजग नागरिकांनी पकडून दिले. याप्रकरणी दोन व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला.



पुरवठा निरीक्षक संदीप निळे यांनी त्याचा तपास केला असता, चौकशीत रेशन धान्य वाहतूकीची मालमोटार (एमएच १७ बीडी १००) चे चालक कैलास चंद्रभान चव्हाण व अकोले विकास सेवा सोसायटीचे रेशन दुकानातील सेल्समन भरत मुरलीधर झोळेकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे यांच्याकडून पुरवठा निरीक्षक अधिकाऱ्यांकडील ७ जुलैचा पंचनामा, पुरवठा निरीक्षण अधिकाऱ्यांचा ९ जुलै रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार, १० जुलैस पुरवठा निरीक्षक संदीप निळे यांना मालमोटार चालक व सेल्समन यांच्याविरुद्ध अकोले पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. ७ जुलैस येथील अकोले विकास सेवा सोसायटीत तहसील कार्यालयाचे अधिनिस्त असलेल्या शासकीय गोदामातून खेतेवाडी गावातील लाभार्थ्यांनपर्यंत स्वस्त धान्य पोहच करण्यासाठी दुपारी १२ वाजता मालमोटारीत भरण्यात आले. पण हे धान्य खेतेवाडीस न नेता अकोले विकास सेवा सोसायटीच्या गोदामात बेकायदेशीर उतरवण्यात येत होते. हा प्रकार संदीप भानुदास शेणकर व सचिन संदीप शेटे यांच्या निदर्शनास आला.

त्यांनी चालक कैलास चंद्रभान चव्हाण (रा. पेमगिरी, ता. संगमनेर) याच्याकडे चौकशी केली असता, हे वाहन गाडे ट्रान्सपोर्ट असल्याचे समजले, या वाहनावरील वाहतूक पास क्रमांक २८२५९७ आढळून आला. त्यानुसार गाडीत ७०.५ क्विंटल तांदूळ १४० गोण्या होत्या, परंतु अत्यावश्यक परवाना नव्हता. पुरवठा निरीक्षक संदीप निळे यांनी घटनास्थळी जावून पंचनामा केला, तांदळाच्या १०० पैकी ९६ गोण्या अकोले सोसायटीच्या स्वस्त धान्य दुकानात उतरवण्यात आल्या. तहसीलदार डॉ. मोरे यांनी निळे यांना चौकशीचे आदेश दिले आहे.

# वीरगाव फाटा ते वीरगाव रस्त्याच्या दुतर्फा चिखल

**जनता आवाज वृत्तसेवा**



**अकोले** : तालुक्यातील वीर- गाव फाटा ते वीरगाव दरम्यान साईडपट्ट्यांवरील माती, मुरूम वाहून गेल्याने डांबरीच्या कडा पोसल्या आहेत. वाहनचालकांसाठी ही बाब धोकादायक बनली असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे रस्त्याच्या बाजूला चर खोदून तेथील माती डांबरी रस्त्याच्या कडेला टाकून साईडपट्ट्या भरण्याचे काम सुरू आहे. ऐन पावसाळ्यात हे काम करत असल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूला चिखल तयार झाला आहे. यामुळे हा रस्ता वाहतुकीसाठी अत्यंत धोकादायक बनला असून वाहनचालकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. ठेकेदाराने चर खोदून गटार करताना तेथील माती रस्त्याच्या बाजूला टाकली आहे. सध्या पडत असलेल्या पावसामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला चिखल झाला आहे. मोठी वाहने आल्यास लहान वाहनांना रस्ता सोडून खाली उतरून चिखलात जावे लागते. त्यात दुचाकीस्वार निसरड्या जागी सरकून पडतात. सध्या जोरदार पावसामुळे हे काम बंद असले तरी यापुढे अशाच प्रकारचे काम केले जाणार असल्याचे दिसते. या प्रकाराला जबाबदार असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर तसेच ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# गौतम पब्लिक स्कूलमध्ये फुटबॉल स्पर्धा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर व कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पब्लिक स्कूल, गौतमनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४, १५ व १६ जुलै रोजी शाळेच्या भव्य फुटबॉल मैदानावर जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन माजी आमदार अशोकराव काळे यांच्या हस्ते संपन्न होणार असल्याची माहिती प्राचार्य नूर शेख यांनी दिली आहे. या स्पर्धेमध्ये अहिल्यानगर जिल्हयातील विविध शाळांतील १५ वर्षाखालील मुले व १७ वर्षाखालील मुले- मुली असे एकूण ३० संघ सहभागी होणार आहेत. स्पर्धेसाठी गौतम पब्लिक स्कूलने आवश्यक असलेली सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे. शालेय प्रशासन विशेषतःसंस्थेच्या सचिव चैतालीताई काळे, विश्वस्त आमदार आशुतोष काळे हे नेहमीच विविध खेळांच्या जिल्हास्तरीय, विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करून खेळास व खेळाडूस प्रोत्साहन देण्यासाठी आग्रही असतात. सदर



स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य नूर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षिका ज्योती शेलार, क्रीडा संचालक व फुटबॉल प्रशिक्षक सुधाकर निलक, हॉकी प्रशिक्षक रमेश पटारे, हॉलीबॉल प्रशिक्षक राजेंद्र आढाव, क्रिकेट प्रशिक्षक इसाक सय्यद, सर्व हाऊस मास्टर्स मेहनत घेत आहेत. या स्पर्धेत जास्तीत जास्त शाळांच्या संघांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे व प्राचार्य नूर शेख यांनी केले आहे.

# मुख्य नाला होणार आता भूमिगत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्या हस्ते आपल्या प्रभागातील विविध विकास कामांचा लोकार्पण सोहळा पार पडला. मोरया फाउंडेशनचे अध्यक्ष केतन खोरे पाटील, माजी नगरसेविका स्नेहल केतन खोरे यांनी प्रभागातील मुख्य समस्या असलेल्या उत्सव मंगल कार्यालय ते महाले पोदार स्कूल नाला (चर) सिमेंट कॉँक्रेटीकरण करत भूमिगत करणे, भोंगळ वस्ती पाईपलाईन जोडणे, पूर्णवादनगर टीपी रिझर्व्हेशन काढणे, प्रभागाला वाढीव निधी देणे या मागण्या ना. विखेंकडे करण्यात आल्या. नामदार विखे यांनी तात्काळ प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी श्रीरामपूर यांना सूचना करत वरील सर्व कामे मार्गी लावा- वे. तसेच उत्सव मंगल कार्यालय ते महाले पोदार स्कूल नाला (चर) सिमेंट भूमिगत कॉँक्रेटीकरण करण्याचे प्रस्ताव दाखल असे आदेश दिले. यावेळी प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अक्षय कर्डिलेंनी घेतला राहुरीत जनता दरबार

**जनता आवाज वृत्तसेवा**



**राहुरी** : राहुरीचे आमदार शिवाजीराव कर्डिले हे अधिवेशनात असल्याने भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले यांनी राहुरी येथे जनता दरबार घेतला. यावेळी नागरिकांच्या समस्यांचा जागेवर निपटारा झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. पाथर्डी राहुरी, नगर, तालुक्यामध्ये अक्षय कर्डिले सध्या चांगल्या प्रकारे सक्रीय झाल्याचे पाहावयास मिळत असून त्यांनी मतदारसंघात लक्ष घालण्यास सुरुवात केली आहे. अक्षय कर्डिले यांच्या जनता दरबारात प्रामुख्याने युवा वर्गाचा मोठा कल पाहावयास मिळत असून युवकांमध्ये अक्षय कर्डिले यांच्या सक्रीयतेमुळे नवचैतन्य निर्माण झाल्याचे देखील दिसत आहे.

राहुरी येथे भरलेल्या या जनता दरबारात अक्षय कर्डिले यांनी महसूल, आरोग्य, कृषी आदी महत्वपूर्ण विषयासंदर्भातील तक्रारींचा निपटारा केला. यावेळी भाजपा प्रदेश राज्य परिषदेचे सदस्य सुभाष गायकवाड, सरचिटणीस राजेंद्र गोपाळे, सिताराम ढोकणे, भाजपा मंडल तालुकाध्यक्ष विक्रम भुजाडी, युवराज गाडे, धनंजय आढाव, अनिल आढाव, नारायण झावरे, शरद किनकर, नंदकुमार डोळस, अजित डावखर, उमेश शेळके, मयूर गवळी, नितीन ढेरे, कांतीलाल जगधने, अनिल पवार आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# महानगरपालिकेच्या वतीने शहरात 'डेंगू मुक्त अभियान'

## पाईपलाईन, हडको परिसरात आरोग्य विभागाची विशेष मोहीम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे शहरातील विविध भागांत डेंगू प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत पाईपलाईन हडको परिसरात शनिवारी विशेष डेंगू मुक्ती मोहीम पार पडली. यावेळी महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे स्वतः उपस्थित राहून नागरिकांना मार्गदर्शन केले. शहराचा झपाट्याने होणारा विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता, प्रत्येक नागरिकापर्यंत



पोहोचणे सहज शक्य नसते.

त्यामुळे महापालिकेच्या वतीने डेंग्यूमुक्ती अभियान हाती घेण्यात आले असून, नागरिकांनी आपल्या परिसरातील स्वच्छतेसाठी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत आयुक्त डांगे यांनी व्यक्त केले. फक्त पालिकेवर अवलंबून न राहता, नागरिकांनी स्वतः पुढे येऊन आपल्या परिसरातील साचलेले पाणी दूर करणे, कोरडे दिवस पाळणे, झाडाझुडपांची सफाई करणे यासारख्या कृतींत सहभाग नोंदवावा. असे केल्यासच आपण डेंगूसारख्या आजारांपासून बचाव करू शकतो, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

### घरोघर केली फवारणी

यावेळी महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घरोघरी जाऊन औषध फवारणी केली, डेंगूविषयक माहितीपत्रके वितरित केली व स्वच्छतेचे संदेश दिले. डेंगूविरोधात लढा सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. महापालिकेच्या या उपक्रमास नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून, इतर उपनगरांमध्येही लवकरच ही मोहीम राबवली जाणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे.

या अभियानात माजी नगरसेवक निखिल वारे, माजी नगरसेविका दीपाली बारस्कर, माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर आदी उपस्थित होते.

माजी नगरसेवक निखिल वारे यांनी आयुक्त डांगे यांच्या कार्यशैलीचे कौतुक करताना सांगितले की, डांगे हे कर्तव्यनिष्ठ अधिकारी असून, ते फिल्डवर उतरून स्वतः काम करत असल्याने कर्मचारीही प्रेरित होतात. त्यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य विभागाचे हे अभियान अधिक प्रभावीपणे राबवले जात आहे. माजी नगरसेविका दीपाली बारस्कर म्हणाल्या की, महापालिकेच्या उपक्रमाला नागरिकांचा साथ लाभल्यासच डेंगूचा प्रादुर्भाव रोखता येईल. आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळावा, साचलेले पाणी वाहते करावे आणि घरासभोवतालच्या परिसराची नियमित स्वच्छता करावी.

हे उपाय सहज असून परिणामकारक आहेत. आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी यावेळी नागरिकांना डेंग्यूचे लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय व तातडीच्या काळजीबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी पाण्याची साठवणूक करताना झाकण लावण्याचा, फ लपात्रं दररोज रिकामी करण्याचा, जुन्या टायर, बादल्या यामध्ये पाणी साचू न देण्याचा सल्ला दिला.

# वैजापूर मर्चन्ट बँकेची विश्वासार्हता कायम : संचेती



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर** : मार्च २०२५ मध्ये संपलेल्या आर्थिक वर्षाच्या आकडेवारीनुसार, बँकेच्या ठेवी सुमारे ५४० कोटी रुपयांवर पोहोचल्या आहेत. तर ३८१ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे एखाद्या तक्रारदाराने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सहकार विभागामार्फत काही त्रुटी काढल्या गेल्या असतील किंवा चौकशी होणार असेल तर त्या त्रुटी दूर करून चौकशीस सामोर जाण्यास आम्ही तयार आहोत. अशा तक्रारींनी ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास तसूभरही कमी होणार नाही, असा विश्वास व्यक्त करत बँकेचे चेअरमन बाळासाहेब संचेती यांच्यासह संचालक मंडळाने, तक्रारदाराने केलेल्या सर्व आरोपांचे खंडन केले. येथील संचेती फायनान्सच्या कार्यालयात काल आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी संचालक उल्हास ठोंबरे, ड. प्रमोद जगताप, विजय वेद, प्रशांत त्रिभुवन, विजय दायमा, विनोद गायकवाड, सावन राजपूत, व्यवस्थापक अशोक कोठारी उपस्थित होते.

संचेती म्हणाले की, बँकेची आर्थिक स्थिती मजबूत असून बँकेने मागील आर्थिक वर्षात एक कोटी ६४ लाख ५५ हजार रुपयांचा नफा कमवला आहे. या वर्षात बँकेने सत्तर टक्के कर्ज वाटप केले आहे. पर्यायाने बँकेचा क्रेडिट डिपॉझिट रेशो ७० टक्के आहे. तर लेखापारीक्षण तपासणीनुसार, बँकेची अनुत्पादक मालमत्ता (एनए) ३.९६ टक्के आहे. मग तक्रारदार बँकेचा एनपीए वाढवून कसा सांगू शकतो असा सवाल संचेती यांनी केला.

यावेळी ड. प्रमोद जगताप यांनीही बँकेच्या पारदर्शक कामकाजाबद्दल सोदाहरण माहिती दिली. सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८३ (१) अन्वये चौकशी करण्यासाठी सभासदाच्या एक पंचमांश सदस्यांची तक्रार असल्याची आवश्यकता आहे असे व्यवस्थापक अशोक कोठारी म्हणाले.

# शेतकऱ्यांनो, कडधान्याच्या उत्पादकता वाढीसाठी प्रयत्न करा

## शालिनीताई विखे पाटील; राष्ट्रीय कडधान्य अभियानाअंतर्गत प्रात्यक्षिक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : कडधान्याच्या उत्पादकता वाढीसाठी शेतकऱ्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाच्या अवलंब करून कडधान्यांमध्ये सक्षम होवून उत्पादकतेत वाढ करावी, यासाठी राष्ट्रीय कडधान्य अभियान हे महत्त्वपूर्ण ठरत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून शेतकरी हिताच्या अनेक योजना सुरू आहेत. या योजनेचा लाभ घेत राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजनेतून शेतकऱ्यांनी




पुढे जावे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

कडधान्य उत्पादकता वाढीसाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून सुरु असलेल्या राष्ट्रीय कडधान्य अभियान अंतर्गत राहाता कृषी अधिकारी आणि सिंधुताई शेतकरी महिला प्रोड्युसर कंपनी यांच्या सहकार्याने राहाता तालुक्यात तुर प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले.

महिला शेतकऱ्यांना तुर बियाणाचे वितरण जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.

सौ. विखे पाटील म्हणाल्या की, राहाता तालुक्यातील विविध गावांमध्ये तालुका कृषी अधिकारी कार्यालय राहता आणि सिंधुताई सिंधुताई महिला शेतकरी प्रोडूसर कंपनीच्या माध्यमातून तूर

> प्रत्येक महिला शेतकऱ्यांनी या योजना समजून घेत या योजनेचा अवलंब करून आपल्या शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करावे. शेती क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. यासाठी कंपनीच्या माध्यमातून देखील प्रयत्न मोठ्या प्रमाणात होत आहेत. यावेळी राहाता तालुक्यातील २२ गावांतील ३५ महिला शेतकऱ्यांना या प्रात्यक्षिकांचा लाभ देण्यात आला.
>
> **– शालिनीताई विखे पाटील**

पिकाची उत्पादकता वाढीसाठी या प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले आहे. वेळोवेळी लागणारे मार्गदर्शन कंपनीच्या माध्यमातून देत असतानाच शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या तुरीची ही खरेदी कंपनीच्या माध्यमातून होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांनी या पिकापासून चांगले उत्पादन घ्यावे असे आवाहन करत आज राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजना या शेतकरीभिमुख ठरत आहे.

# गुरु हेच जीवनाचे खरे मार्गदर्शक : डॉ. फसले

**पाथर्डी** : आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगातही गुरूचे स्थान अढळ असून तेच आपले खरे जीवनविषयक मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन बोधेगाव येथील आबासाहेब काकडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मच्छिंद्र फसले यांनी केले.

बाबुजी आव्हाड महाविद्यालयात आयोजित गुरुपौर्णिमा उत्सव कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे होते. यावेळी दादा महाराज बडे, डॉ अशोक




डोळस, डॉ. अशोक कानडे, डॉ. अजयकुमार पालवे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. फसले म्हणाले की, इंटरनेट, सोशल मीडिया यांसारखी माहितीची साधने आज सहज उपलब्ध झाली असली, तरी त्या माहितीचा योग्य उपयोग कसा करावा, हे शिकवणारे गुरूच असतात. आजचा समाज घडविणारा वा बिघडविणारा देखील ज्ञानीच असतो, पण त्याचे ज्ञान जगाला समृद्ध करणारे असले पाहिजे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमात अनुजा धाडगे, रोहिणी खाडे व मारिया सिरसे या विद्यार्थिनींनी गुरुमहात्म्य विषयी मनोगत मांडले. प्रास्ताविक डॉ. अशोक कानडे यांनी केले. तर सूत्रसंचालन डॉ. अशोक डोळस यांनी करून आभार डॉ. अजयकुमार पालवे यांनी मानले.

> ज्ञान, संस्कार आणि विचार हेच गुरूकडून मिळणारे खरे धन असून आधुनिक काळातही गुरूचे महत्त्व कमी झालेले नाही. देवाच्या आधी गुरूचे स्मरण हीच आपल्या संतांची शिकवण आहे.
>
> **– दादा महाराज बडे**

# गणेश राऊत आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत 'बी द चेंज' फाउंडेशन या सामाजिक संस्थेने श्रीगोंदा तालुक्यातील शेडगाव येथील सुपुत्र गणेश रोहिदास राऊत यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरवले आहे. सध्या ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेलवंडी येथे कार्यरत आहेत.



शिर्डी येथे सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ डॉ. पोपटराव पवार होते. त्यांच्या हस्ते राज्यातील ३६ जिल्ह्यांतील ३६ शिक्षकांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

गणेश राऊत यांनी ग्रामीण भागात कार्यरत राहून गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा विकास, विविध उपक्रमांची अंमलबजावणी आणि सामाजिक जाणीवेच्या कार्यातून एक आदर्श शिक्षक म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

# खर्ड्यातील निंबाळकर समाधी स्थळ दुर्लक्षित?

## पुरातत्व खात्याचे दुर्लक्ष; ऐतिहासिक समाधी नष्ट होण्याच्या मार्गावर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** खर्डा येथील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या खर्ड्याच्या पर्यटन व तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात समाविष्ट झालेल्या, 'राज्य संरक्षित स्मारक' असलेली खर्डा येथील सरदार आप्पासाहेब निंबाळकर यांची छत्री (समाधी) आजही पुरातत्व खात्याच्या मेहरबानीची वाट पाहत दिवस कंठत आहे.

खर्डा या ऐतिहासिक गावात वेगवेगळ्या भूमितीक आकृत्या, मोर, पोपट, मोतीहार खाणारे राजहंस, बदक अशा नानाविध शिल्परत्नांनी नटलेली, मीनार युक्त घुमट असणारी निंबळकरांची समाधी ही मराठा स्थापत्य शैलीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. या छत्रीवर अनेक झाडे झुडपे उगवली आहेत. मोठ्या झाडांमुळे समाधीच्या घुमटाचे बांधकाम कोसळेल की काय? अशा अवस्थेत येऊन पोहोचले आहे. या समाधीवरील दोन-तीन दगडी मिनार मागील चार पाच वर्षात पडून नाहीसे झाले आहेत व इतरही मीनाऱ्यांची त्या दिशेने वाटचाल चालू आहे. वेळेत जर जतन व संवर्धनाचे कार्य हाती घेतले नाही, तर हा शौर्याचा व स्तापत्य शिल्पाचा वारसा नष्ट होण्यास पुरातत्त्व खात्याचा निष्काळजीपणा कारणीभूत ठरेल.

### ...तर हे समाधी स्थळ नष्ट होईल?

पुरातत्व खात्याने हे समाधी स्थळ ताब्यात घेतल्यामुळे स्थानिक नागरिक, स्थानिक प्रशासन व ग्रामपंचायत यांना देखील कायद्याच्या कचाट्यात कार्यवाहीच्या बडग्याच्या भीतीने काम करावयास धजत नाहीत. यामुळे हे समाधी स्थळ दुर्लक्षित असल्याचे पहावयास मिळते लवकर जर पुरातत्व खात्याने याकडे लक्ष नाही दिले तर हे समाधी स्थळ नष्ट होण्याची भीती इतिहास प्रेमींना वाटते.

### स्मृतीस्थळांसह समाध्यांची दयनीय अवस्था?

मराठा स्थापत्यकलेचा अजोड नमुना असणारे गडकिल्ले, वास्तू स्थापत्यांची युनेस्कोच्या जागतिक यादीत नाव येण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्न करत आहे. जगभरात मराठा किल्ला स्थापत्यशास्त्राचे कौतुक आणि नोंद घेतली जात असताना मराठा शैलीतील शुर सरदारांच्या स्मृतीस्थळांची, समाध्यांची दयनीय अवस्था पहावयास मिळते.



# बोत्रेंच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** साखर उद्योगात ओंकार शुगर ग्रुपच्या माध्यमातून राज्यात जाळे विणणारे बाबुराव बोत्रेपाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने विद्यार्थ्यांना मिठाई वाटप, हिरडगाव येथील गौरी शुगर कारखान्यावर वृक्षारोपण, आरोग्य तपासणी, रक्तदान शिबीर तसेच श्रीकांत पावणे यांचे प्रवचनाचा कार्यक्रम आयोजीत केला.

> ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी ओंकार शुगर ग्रुपची स्थापना केली आणि ऊसाला रास्त भाव आणि परिसराचा विकास केला जात आहे. भविष्यात शाळांना मदत केली जाईल.
>
> **– प्रशांत बोत्रे**



यावेळी ओंकार शुगरचे संचालक प्रशांत बोत्रे, रेखा बोत्रे, गौरी शुगरचे कार्यकारी संचालक रोहीदास यादव, गंगाराम दरेकर, सरपंच विद्या बनकर, उपसरपंच अमोल दरेकर, विकास क्षीरसागर, नवनाथ देवकर उपस्थित होते.

यावेळी घुगल वडगाव येथील महामानव डॉ. बाबा आमटे सेवा संस्थेतील मुलांना शालेय साहित्य व मिठाई वाटप करण्यात आले. अभिष्टचिंतन सोहळ्याची सांगता श्रीकांत पावणे यांच्या प्रवचनाने झाली.

# जाधववाडी सेवा संस्थेच्या चेअरमनपदी हनुमंत राऊत

## व्हाईस चेअरमनपदी जाधव यांची बिनविरोध निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पारनेर तालुक्यातील जाधववाडी व राऊतवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी हनुमंत राऊत, तर व्हा. चेअरमनपदी यशवंत जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.





मावळते चेअरमन व व्हा. चेअरमन यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे या रिक्त पदांसाठी निवडणुकीचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, संस्थेचे संचालक व ग्रामस्थांनी एकमताने आणि शांततापूर्ण वातावरणात या दोन्ही पदांवर नव्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करून लोकशाही प्रक्रियेला बळकटी दिली आहे.

नूतन चेअरमन राऊत व व्हा. चेअरमन जाधव यांचे राऊतबाबा पतसंस्थेचे चेअरमन आनंदराव राऊत, बाळासाहेब राऊत, सुदाम जाधव, धमाजी सोमवंशी, राजेंद्र राऊत, गौतम राऊत, ज्ञानदेव राऊत, मुकेश राऊत, किसन राऊत, भागाजी राऊत, मच्छिंद्र राऊत, अर्जुन राऊत, बन्सी महाराज जाधव, नाथा जाधव, शिवाजी जाधव, लहू जाधव, राजाराम जाधव, वैभव जाधव, भालचंद्र राऊत, रवी राऊत आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

या निवडणुकीत निवडणूक अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक कार्यालयाच्या शुभांगी सराफ यांनी काम पाहिले. तर सहाय्यक म्हणून संस्थेचे सचिव दत्तात्रय पतके यांनी काम पाहिले.

### निवडणुका बिनविरोध करण्याचा आदर्श

राजकीय वातावरणातील मतभेद, खर्च व संघर्ष टाळण्यासाठी जाधववाडी व राऊतवाडी चे ग्रामस्थ नेहमीच एकत्र येऊन सेवा संस्था, ग्रामपंचायत व पतसंस्था या गावपातळी वरील संस्थेच्या निवडणुका बिनविरोध करून सक्षम करण्याचा आदर्श इतर गावांना देत आहे.

# आदित्यची शिष्यवृत्ती परिक्षा गुणवत्ता यादीत वर्णी




**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या घेण्यात आलेल्या पुर्व उच्च माध्यमिक इ.५ वी शिष्यवृत्ती परीक्षा फेब्रुवारी २०२५ मध्ये देऊळगाव केंद्रातील टाकळी लोणार जि. प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी आदित्य हुमदेव मोरे याचा २५०/३०० मार्क मिळवुन ११६ वा क्रमांक मिळवत गुणवत्ता यादीत निवड झाली.

आदित्य हुमदेव मोरे यास वर्गशिक्षिका सविता गोडसे, मुख्याध्यापक राजाराम घोडके, रविंद्र वाव्हळ, सदाशिव मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

### आदित्यचे दिग्गज मान्यवरांकडून कौतुक

आदित्यचे शिवाजी भांडवलकर, शरद गलांडे, सरपंच अर्चना दरवडे, उपसरपंच गुलाब शेख, संतोष दरवडे, सर्जेराव कदम, कैलास मते, अप्पासाहेब रोडे, युवराज पळसकर, अल्ताफ शेख, अजिनाथ मोतेकर, संतोष टकले, नितिन शेळके, संदीप बोत्रे, केंद्रप्रमुख माणिकराव आढाव, निळकंठ बोरुडे, सत्यजित मच्छिंद्र, कुसूमकुमार कानडी आदींनी कौतुक करून अभिनंदन केले.

# राष्ट्र उभारणीत युवा पिढीचे योगदान महत्त्वाचे : पाटेकर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कुकाणा**: शिक्षण हे लोकसंख्या नियंत्रणासाठी महत्त्वाचे पाऊल असून लोकसंख्या नियंत्रण ही काळाची गरज आहे. युवा पिढीने सजग राहायला हवे, राष्ट्र उभारणीत युवा पिढीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन नेवासाचे गटविकास अधिकारी सुरेश पाटेकर यांनी केले.

नेवासा तालुक्यातील कुकाणा माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक लोकसंख्या दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्याधिकारी डॉ. कैलास कानडे होते. प्रास्ताविक प्रा. संतोष तागड यांनी केले.

युवक व युवतींनी आपल्या करीअर कडे लक्ष द्यावे. जीवनात काही चांगले छंद जोपासावे व आनंद घ्यावा जीवनाचे, निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण करायला शिका.

# ...कोणतेही प्रश्न घेवून या, त्वरित सोडवू

## तहसीलदार मिलिंद कुमार वाघ; दिव्यांग हातपाय व कॅलिपर्स मोफत वितरण कार्यक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : आजच्या या शिबिराच्या माध्यमातून जे दिव्यांग बांधव कुणाच्या तरी मदतीने चालत होते. त्यांना स्वतःचा पाय आणि हात मिळणार आहे, ही एक मोठी आनंदाची बाब आहे. आज या शिबिराच्या माध्यमातून स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्याची ऊर्जा मिळणार आहे. स्वबळावर स्वतःचे काम करण्याचा आनंद हा अद्वितीय आहे.आजच्या शिबिरात दिव्यांगांचे मोजमाप घेऊन त्वरित साहित्य वाटप केले जाणार आहे. महसूल किंवा इतर कुठल्याही विभागाचे प्रश्न घेऊन या त्वरित सोडविले जातील अशी ग्वाही दिव्यांग हातपाय व कॅलिपर्स मोफत वितरण कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी श्रीरामपूरचे तहसीलदार मिलिंद कुमार वाघ यांनी केले.

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय जिल्हा परिषद, भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम कानपूर, एस. आर. ट्रस्ट, रोटरी मूकबधिर



विद्यालय श्रीरामपूर, अपंग सामाजिक विकास संस्था श्रीरामपूर, आसान दिव्यांग संघटना महाराष्ट्र, पंचायत समिती श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने अस्थीव्यंग दिव्यांगांसाठी कृत्रिम हातपाय बसविणे व कॅलिपर्स मोजमाप आणि तात्काळ मोफत वितरण शिबीर आयोजित करण्यात आले होते.

> प्रथमतः च दिव्यांगांसाठी मोजमाप व तात्काळ साहित्य वाटप करण्याचं काम सर्व संयोजन संस्था आणि शासनाच्या माध्यमातून या ठिकाणी केले आहे. प्रशासनामार्फत विविध योजना दिव्यांगाकरीता राबविली जातात. त्या माध्यमातून वेगवेगळ्या योजना राबविल्या जातात. त्याचा लाभ दिव्यांग बांधवांनी घ्यावा,
>
> **– प्रविण सिनारे, गटविकास अधिकारी**

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी यशस चुंबळे, सहाय्यक गटविकास अधिकारी सुभाष म्हस्के, मनसुखलाल चोरडिया, वर्षा गायकवाड, विनोद पाटणी, संजय साळवे, संतोष जोशी, मुस्ताक तांबोळी, बाळासाहेब सातपुते, प्रमोद आडे, प्रफुल गवारे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक संजय साळवे यांनी केले. तर आभार दीपक तरकासे यांनी मानले.

# रासायनिक खतांच्या खरेदीसाठी कृषी केंद्रावर लागल्या रांगा

## व्यापाऱ्यांकडून तालुक्यात खतांची कृत्रिम टंचाई?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : मान्सनपूर्व पावसाने पारनेर तालुक्यातील अनेक भागांत जोरदार हजेरी लावली असून खरिपाची पिके जोमात आहेत; त्यामुळे या खरीप हंगामातील पिकांसाठी रासायनिक खतांची टंचाई जाणवू लागल्याने कृषी केंद्रांवर रांगा लागत आहेत. दुसरीकडे, पारनेर तालुक्यातील अनेक कृषी केंद्रचालकांनी खतांची कृत्रिम टंचाई निर्माण केली असून, अशा कृषी केंद्रचालकांवर कृषी विभाग कारवाई करणार का? असा सवालही शेतकरी करू लागले आहेत.



आधार कार्ड लिंकवर कृषी केंद्रचालक या शेतकऱ्यांना खते वितरित केली जात असून यामध्ये गोलमाल असल्याचा संशय शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. खरीप हंगामातील पिकांना युरियासह इतर रासायनिक खतांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढल्याने टंचाई निर्माण झाली आहे; तर दुसरीकडे, व्यापाऱ्यांनी खतांच्या गोणीबरोबर टॉनिक किंवा इतर रासायनिक औषधांच्या खरेदीची सक्ती केल्याने शेतकरी वर्गात नाराजी व्यक्त केली जात आहे. पारनेर तालुक्यातील कृषी केंद्रचालकांकडून बियाणे व रासायनिक खतांचा काळाबाजार किंवा गैरप्रकार होऊ नये यासाठी कृषी व पंचायत समिती अधिकारी यांचे संयुक्त पथक स्थापन करण्यात आले आहे; परंतु या हंगामात सर्व काही आलबेल असल्याचे चित्र कृषी विभागाकडून निर्माण केले जात आहे.

एकीकडे रासायनिक खतांची टंचाई, तर दुसरीकडे अव्वाचे सव्वा भाव यांमुळे शेतकरी भरडला जात आहे. कृषी विभागाच्या या भरारी पथकाकडून दोन महिन्यांत एकाही कृषी केंद्रचालकांवर कारवाई केली नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### आ. दातेंनी वेधले लक्ष

पारनेर तालुक्यातील कृषी केंद्रचालकांनी बाजरीसह कांदा बियाण्यांची विक्री केली. मात्र अनेक ठिकाणी कांदा व बाजरी बियाणे उगवले नसल्याने शेतकऱ्यांना दुबार पेरणीचे संकट उभे राहिले आहे. त्यामुळे या संदर्भात आमदार काशीनाथ दाते यांनी विधानसभेत लक्ष वेधत एक प्रकारे कृषी विभाग व कृषी केंद्रचालकांच्या गैरकारभाराकडे लक्ष वेधले आहे.

# संपत बारस्कर यांच्यावतीने वृक्षारोपण



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज बनली असून संपत बारस्कर यांनी प्रभागातील नागरिकांना 'मागेल त्याला झाड' हा उपक्रम सुरू केला असल्यामुळे वृक्षरोपण व संवर्धनाची लोकचळवळ उभी राहिली आहे.

या माध्यमातून प्रभाग क्रमांक १ हा हरित प्रभाग म्हणून ओळखला जाणार आहे. पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे दिवसेंदिवस वातावरणात देखील बदल होताना दिसत आहे. पुढच्या पिढीची गरज ओळखून प्रत्येक व्यक्तीने 'एक तरी झाड लावणे' गरजेचे आहे. मेट्रो सिटी सारख्या शहरांमध्ये प्रदूषणाने नागरिक त्रस्त झाले आहे, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज बनली असल्याचे प्रतिपादन शाहीर अरुण आहेर यांनी केले आहे. देवीकृपा वसाहत येथे माजी विरोधी पक्ष नेते संपत बारस्कर यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते वृक्षारोपण संपन्न झाले. शाहीर अरुण आहेर, संदीप गोसावी, सुभाष सोनवणे, शरद गुंड, शिवाजी साळवे, विठ्ठल लोखंडे, मंगेश साळवे, प्रभाकर घोरपडे, सुरेखा अडम, रोहिणी आहेर, सुकन्या गोसावी आदी उपस्थित होते.

# राहाता तालुक्यात सहकार सप्ताह साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ आणि भारत सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या स्थापना दिनानिमित्त महाराष्ट्र सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली राहाता तालुक्यात १ ते ४ जुलै २०२५ या कालावधीत मंगेश सुरवसे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहिल्यानगर यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, राहाता या कार्यालयाने विविध उपक्रमांचे आयोजन करून सहकार चळवळीबाबत जनजागृती करण्यात आली. १ जुलै रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती येथे वृक्ष लागवडीचा उपक्रम राबविण्यात आला, ज्यामध्ये पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

२ जुलै रोजी राहाता तालुक्यातील सर्व पतसंस्थांसाठी शासनाकडील परिपत्रके आणि पतसंस्था नियामक मंडळाने दिलेल्या सूचनांबाबत मार्गदर्शनपर शिबीर आयोजित करण्यात आले. यावेळी सहाय्यक निबंधक नामदेव ठोंबळ, आणि राहाता मर्चन्ट पतसंस्थेचे व्यवस्थापक श्री. गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. यावेळी तालुक्यातील पतसंस्थांचे व्यवस्थापक उपस्थित होते. ३ जुलै रोजी राहाता येथील शारदा विद्या मंदिरात शाळेतील ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यावेळी सहाय्यक निबंधक श्री. ठोंबळ यांनी विद्यार्थ्यांना सहकार या विषयावर मार्गदर्शन केले. ४ जुलै रोजी तालुक्यातील सर्व विविध कार्यकारी सेवा सोसायटींसाठी संगणकीकरणाचे कामकाज आणि ई-ऑडीट या बाबत चर्चासत्र घेण्यात आले. यावेळी जिल्हा सहकारी बँकेचे तालुका विकास अधिकारी, तालुक्यातील सोसायट्यांचे सचिव, इन्फुज कंपनीचे प्रतिनिधी तसेच सहाय्यक निबंधक कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# गोदावरी उजव्या कालव्याच्या मजबुतीकरणाचे काम सुरु

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणतांबा** : ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नामुळे गोदावरी उजव्या कालव्याचे मजबुतीकरण, खोलीकरण तसेच रुंदीकरणाचे काम अस्तगाव माथ्यापासून पुणतांबा टेलपर्यंत गेल्या दोन महिन्यांपासून अनेक यांत्रिक साधनांद्वारे वेगाने सुरू आहे. खोलीकरणासाठी कालव्याच्या तळातील मुरूम उकरून कासाच्या दोन्ही बाजूला बरगडीला टाकला जातो आणि फोकलँडच्या बकेटने तो दाबला जातो. मात्र मध्यंतरी गोदावरी उजव्या कालव्याला पाणी आल्यानंतर बऱ्याच ठिकाणी मुरूम ढासळल्याचे



प्रकार घडले. एवढेच नाही तर एक दिवस अधिक पाऊस पडल्यामुळे कालव्याच्या दुतर्फा केलेल्या रसावर साचलेले पाणी कालव्याच्या उतार बाजूने असल्यामुळे कालव्यात पडले. त्यामुळेही ठिकठिकाणी वरंगळ्या पडलेल्या दिसून येत होत्या. त्यामुळे दुरुस्ती व मजबुतीकरणाच्या कामाबाबत शेतकरी वर्गात साशंकता निर्माण झाली होती.

# भाजपाच्या राज्य परिषदेवर कोरडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : भारतीय जनता पार्टीच्या राज्य परिषदेवर सदस्य म्हणून निष्ठावंत म्हणून ओळखले जाणारे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विश्वनाथ कोरडे यांची निवड करण्यात आली आहे.



विश्वनाथ कोरडे हे भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्याच बरोबर ते जिल्हा परिषदेचे माजी सदस्य म्हणून ही पारनेर तालुक्यातील राजकीय क्षेत्रात कार्यरत आहे.

भाजपाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांपासून ते राष्ट्रीय नेतृत्वापर्यंत संपर्क असलेले पारनेर तालुक्यातील एकमेव नेते आहे.सध्या ते कोणत्याही राजकीय लाभाच्या पदावर नसतानाही त्यांनी पारनेर तालुक्यातील प्रलंबित विकास कामांसाठी राज्य व केंद्र सरकारकडून कोट्यवधी रुपयांचा निधी आणला असून त्यांनी अनेक कामे मार्गी लावली आहेत.

त्यांच्या निवडीचे नेत्यांबरोबरच कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे. त्यांच्या निवडीमुळे भाजपा मध्ये निष्ठावंत कार्यकर्त्याला योग्य वेळी, योग्य संधी मिळते, हे आधोरेखित झाले आहे. विश्वनाथ कोरडे यांच्या निवडी च्या रूपाने पारनेर तालुक्यातील सामान्य कुटुंबात ते ही बाभुळवाडे सारख्या ग्रामीण खेड्यातील व्यक्ती ला देश व राज्य पातळीवर सत्ताधारी असणाऱ्या पक्षाने दोनदा राज्य कार्यकारिणी वर निवड करून काम करण्याची संधी दिल्या बद्दल पारनेर तालुक्यात कार्यकर्त्यां नी जल्लोष केला आहे.

# जागतिक लोकसंख्या सप्ताहाचे आयोजन

## कुटुंब नियोजन पद्धतींचा प्रचार व प्रसार



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : दरवर्षी ११ जुलै हा जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त ११ ते १८ जुलैदरम्यान जागतिक लोकसंख्या सप्ताह साजरा करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे यांनी दिली. कुटुंब नियोजन पद्धतींचा प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध प्रभावी माध्यमांचा वापर करून हा दिन साजरा केला जातो.

कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा उद्देश फक्त अनिच्छित गर्भधारणा टाळणे एवढाच नसून माता व बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही तो महत्त्वाचा आहे. कुटुंब नियोजन सेवांविषयी अज्ञानामुळे अनावश्यक गर्भधारणा, मातामृत्यू आणि अर्भक मृत्यू होतात. या दुष्परिणामांना टाळण्यासाठी आरोग्य विभागामार्फत लाभार्थ्यांना विविध पर्याय उपलब्ध करून दिले जातात. त्यामध्ये प्रामुख्याने स्त्री व पुरुष शस्त्रक्रिया, गर्भनिरोधक गोळ्या, तांबी, निरोध यांसह नवीन पद्धती जसे की गर्भनिरोधक तिमाही इंजेक्शन व आठवड्याला एक गोळी यांचा समावेश आहे. नियोजित पालकत्वासाठी आरोग्यदायी वेळ आणि गर्भधारणेमधील अंतर या विषयाशी सुसंगत ठरावे म्हणून यावर्षीचे घोषवाक्य आहे.

यानिमित्त आरोग्य विभागाने दिलेल्या कुटुंब नियोजन पद्धतींचा वापर करून पाळणा लांबवणे, कुटुंबातील सदस्यसंख्या मर्यादित ठेवणे, लोकसंख्या नियंत्रण व माता-बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रत्येकाने सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# रेल्वेने हटविले धोकादायक पोल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणतांबा** : पुणतांबा श्रीरामपूर रस्त्यावरील रेल्वेने लावलेले पोल हटवण्यास सुरुवात केली आहे. याबाबत दैनिक 'जनता आवाज' मध्ये वृत्त प्रकाशित करून पुणतांबेकरांची भूमिका मांडली होती. या वृत्ताची दखल रेल्वेने घेतल्यामुळे पुणतांबेकरांनी 'जनता आवाज' ला धन्यवाद दिले आहेत. पुणतांबा- श्रीरामपूर रस्त्यावरील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत रेल्वेने पोल रोवून आपली हद्द निश्चित केली होती.

याला ग्रामस्थांनी विरोध करून रेल्वेने आपली हद्द सोडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत फुल




रोवल्याचे निदर्शनास आणून दिले. अपघात घडण्याचे प्रकार वाढले असते सार्वजनिक बांधकाम विभाग श्रीरामपूर यांच्याकडे ग्रामपंचायतच्या वतीने लेखी पत्र देण्यात आले होते. यासाठी माजी सरपंच डॉक्टर धनंजय धनवटे मुरलीधर थोरात पाठपुरावा केला होता. त्याला अखेर यश आले असून रेल्वेने लावलेले पोल हटवण्यास सुरुवात केली आहे.

खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्याकडे देखील ठाकरे गटाचे शहर प्रमुख महेश कुलकर्णी व सरपंच स्वाती पवार यांनी भेट घेऊन रेल्वेच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली होती. रेल्वेने लावलेले पोल काढून टाकावे, अशी मागणी केली होती. खासदार वाकचौरे यांनी देखील रेल्वेच्या अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला होता.

# जवळा येथे जवळेश्वर रथयात्रा साजरी

## सभापती प्रा. राम शिंदे व खासदार निलेश लंके यांची हजेरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : गुरूपोर्णिमे निमित्त तालुक्यातील जवळा येथे श्री जवळेश्वर रथयात्रा मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त हजारो भाविकांनी रथयात्रेला हजेरी लावली. श्री जवळेश्वर रथयात्रा राज्यात प्रसिध्द असून, गुरूपोर्णिमेनिमित्त साज-या होणा-या रथयात्रेला वेगळे महत्व आहे. रथयात्रेनिमित्त सकाळी जवळेश्वर मुकुटाची आरती करून, रथामध्ये प्राणप्रतिष्ठापणा करण्यात आली. यावेळी भाविकांनी रथाचे दर्शन घेतानाच नारळाचे तोरण रथाला अर्पण केले.



दुपारी एक वाजता रथाची महाआरती करून, मिरवणूकीस प्रारंभ करण्यात आला. रथ रात्री बारा वाजणेच्या सुमारास रथयात्रा जवळेश्वर मंदिरासमोर आल्यानंतर हरहर महादेवाचा जयघोष होवून यात्रेची सांगता झाली.


यात्रे निमित्त विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, खासदार निलेश लंके यांनी जवळा येथे येवुन जवळेश्वराचे दर्शन घेतले. जेष्ठनेते प्रा मधुकर राळेभात, बाजार समितीचे सभापती शरद कार्ले, संचालक सुधीर राळेभात, माजी सभापती डॉ. भगवान मुरूमकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याचे आनावरण करावे

## शासकीय विश्रामगृह येथे समाजबांधवांची बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : अनेक वर्षपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याची मागणी समाज बांधवांच्या वतीने करण्यात आली असून, ही मागणी मान्य झाली व जुन्या पुतळ्याशेजारी नवीन पुतळा उभारण्यासाठी सुशोभिकरण करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा देखील बसवण्यात आला. मात्र अद्यापही पुतळ्याचे अनावरण करण्यात आले नसून हा पुतळा झाकलेल्या अवस्थेमध्येच आहे.



त्यामुळे ही एक प्रकारे समाजाच्या आस्थेची विटंबना होत असून, लवकरात लवकर पुतळा अनावरण करण्याच्या मागणीसाठी १० जुलै रोजी शासकीय विश्रामगृह येथे समाजबांधवांच्या उपस्थितीत बैठक आयोजित केली होती. यामध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात आली व कोणावरही टीका न करता समाज हा चार मुंडके नसून समाजाची मोठी लोकसंख्या आहे.

याच समाजाला सोबत घेऊन चर्चा केली पाहिजे. इतर व्यक्ती समाज समजून समाजाची दिशाभूल करत आहे. त्यामुळे आज समाजाने एकदिलाने निर्णय घेऊन येणाऱ्या २७ जुलै रोजीच पुतळ्याचे अनावरण होणार असून कार्यक्रमाची रूपरेषाही समाज ठरवेल.

कार्यक्रमाला कोणत्याही प्रकारचे गालबोट लागल्यास त्यास महापालिका प्रशासन जबाबदार राहणार असून, समाजाला विचारात घेऊन महापालिका आयुक्तांनी कार्यक्रमाची रूपरेषा ठरवावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारा हा समाज आहे. बैठकीमध्ये समाजबांधवांनी विविध संकल्पना सुचवल्या आहे. यामध्ये कार्यक्रमाच्या ठिकाणी समाजबांधवांच्या वतीने बुद्धवंदना घेण्यात येणार असून,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे २२ प्रतिज्ञापत्र जो कोणी म्हणून दाखविल त्या व्यक्तींच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे.

# ग्रामविकास मंत्रालयाच्या बनावट आदेशाचा तपास सुरु

## ठेकेदार फरार: भिंगार, कोतवालीकडून चौकशी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : ग्रामविकास मंत्रालयाचा बनावट आदेश प्रकरणी विद्युत विभाग व नगर शहर उपविभागाच्या वतीने दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. विद्युत विभागातील कामांचा भिंगार कॅम्प पोलिसांकडून तर रस्त्यांच्या कामाचा तपास कोतवाली पोलिसांनी सुरू केला आहे. त्यात आणखी कुणाचे हात गुंतलेले आहेत का? यादृष्टीने चौकशी करण्यात येत आहे. ग्रामविकास मंत्रालयाच्या बनावट आदेशाचे प्रकरण राज्यभर गाजत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातही बनावट आदेश सादर करून कामे घेण्यात आली आहेत. नगर शहर उपविभागाचे कनिष्ठ अभियंता सचिन सुभाष चव्हाण यांनी याबाबत कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यामध्ये ठेकेदार अक्षय चिर्के याने ग्रामविकास मंत्रालयाचा ३ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या आदेशाची छायांकित प्रत दाखवून ५ कोटी ६५ लाखांची ३३ कामे मिळविली होती. यातील काही कामांची बिले ग्रामविकास मंत्रालयाला सादर केल्यानंतर ही बाब समोर आली. त्यानंतर विद्युत विभागातही बनावट आदेश देऊन ९ कोटी ९० लाखांची कामे घेतल्याचे असून याप्रकरणी कनिष्ठ अभियंता सुप्रिया कांबळे यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात गुरुवारी फिर्याद दिली आहे. त्यामध्ये ठेकेदाराच्या नावाचा उल्लेख नाही. तो ठेकेदार कोण, याची पोलिस चौकशी करत आहेत.

ग्रामविकास मंत्रालयाचा बनावट आदेश प्रकरणातून निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यारंभ आदेश देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची यंत्रणा वेगाने राबल्याचेही समोर आले आहे. नगर उपविभागाला हा आदेश ४ ऑक्टोबरला मिळाला. त्यानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करून १५ ऑक्टोबर २०२४ रोजी कामांना कार्यारंभ आदेश दिला गेला. दुसऱ्या प्रकरणातही १२ ऑक्टोबरला बनावट आदेश मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन २८ ऑक्टोबर २०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आल्याचे समोर आले आहे.

# फादरचा सल्ला; महिलेचा झाला मृत्यू

## कोपरगावात फादर विरुद्ध जादूटोणा प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : काविळ झालेल्या महिलेला औषधोपचार घेण्याचा सल्ला न देऊन मंत्र म्हणत पाणी अंगावर शिंपडले. तेल कपाळावर लावण्यास दिले. असे प्रकार करत राहिल्याने काही दिवसांतच महिलेचा मृत्यू झाला. तिच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या फादर चंद्रशेखर गौडा याच्याविरुद्ध कोपरगाव शहर पोलिस ठाण्यात गुरुवारी रात्री बारा वाजता जादूटोणा प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संजय जीवन पंढरे हे कोपरगाव शहरातील खडकी परिसरात



राहतात. त्यांच्या घराजवळच बहीण वनिता विश्वनाथ हरकळ राहते. १ जुलै रोजी वनिता आजारी पडली. तिला संजय पंढरे यांचा पुतण्या विवेक पंढरे हा डॉक्टरांकडे घेऊन गेला. त्यानंतर पुन्हा ३ जुलै रोजी डॉक्टरांनी तपासण्या केल्यानंतर काविळ झाल्याचे सांगितले. काही जणांनी आयुर्वेदिक औषधी घेण्याचा सल्ला दिला. पुतण्या संजय पंढरे हा सायंकाळी औषधी घेऊन घरी आला तेव्हा समतानगर चर्चमधील फादर चंद्रशेखर गौडा हे वनिता यांच्या शेजारी बसलेले होते. ते म्हणाले, यांना कुठलाही आजार नाही. कोणतेही औषध घेऊ नका. त्यांना बाहेरची बाधा झाली आहे. यावेळी फादरने त्यांच्याकडे असलेल्या तेलाच्या बाटलीवर हात ठेवून मंत्र म्हटले. हे तेल कपाळावर लावायला सांगितले. बाटलीतील पाणी हातावर घेऊन मंत्र म्हणत ते पाणी वनिता यांच्या अंगावर शिंपडले. तसेच दिवसातून तीन-चार वेळेस बाटलीतील पाणी पिण्याचा सल्ला दिला. त्यांच्या मृत्यूस फादर चंद्रशेखर गौडा हे कारणीभूत असल्याची फिर्याद संजय पंढरे यांनी कोपरगाव शहर पोलिस ठाण्यात दिली. यावरून चंद्रशेखर गौडा ाच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१) सह महाराष्ट्र जादूटोणा प्रतिबंधक अधिनियम २०१३चे कलम ३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वनिता हरकळ यांची तब्येत खालावली


दरम्यान ४ जुलै रोजी वनिता यांची प्रकृती खालावली. त्याच दिवशी वनिता यांना लोणी येथील प्रवरा हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. डॉक्टरांनी तेथे दाखल करून घेतले. औषधोपचार सुरू असताना ९ जुलै रोजी वनिता हरकळ यांचा मृत्यू झाला.




## हिमोग्लोबिन का वाढलंय?

**विचारा प्रश्न**

मी अलिकडेच संपूर्ण रक्तचाचणी करून घेतली. त्यात रक्तातल्या हिमोग्लोबिनमध्ये वाढ झाल्याचं दिसून आलं. हेमेटाक्रिट तसंच लाल रक्तपेशींमध्ये वाढ झाल्याचंही आढळलं. इतर चाचण्यांचे निकाल सामान्य आले. डॉक्टरांनी काळजीचं कारण नसल्याचं सांगितलं आहे. हिमोग्लोबिनचं जास्त प्रमाण आरोग्याला हानिकारक ठरतं का?




**उत्तर :** व्यक्तीचं वय आणि लिंग यानुसार लाल रक्तपेशींच्या संख्येत फरक आढळून येतो. महिलांपेक्षा पुरूषांच्या रक्तात लाल रक्तपेशींची संख्या जास्त असते. प्रौढांपेक्षा नवजात अर्भकांच्या शरीरात लाल रक्तपेशी जास्त असतात. लाल रक्तपेशींच्या जास्त प्रमाणाला एरिथ्रोसिस्टोसिस किंवा पॉलिसीथॅमिया म्हटलं जातं. एरिथ्रोपोएटिन नावाच्या हार्मोनमुळे शरीरात लाल रक्तपेशींची निर्मिती होते. हे हार्मोन किडनीतून स्रवतं. एरिथ्रोसिस्टोसिस हा विकार नाही. पण एखाद्या शारीरिक समस्येचं लक्षण असू शकतं. वाढलेल्या हिमोग्लोबिनमागे बरीच कारणं असू शकतात. त्यामुळे नेमकं कारण सांगता येणार नाही. वैद्यकीय तज्ज्ञांकडून योग्य मार्गदर्शन मिळेल.

## ‘व्हिटॅमिन डी’च्या कमतरतेमुळे...

**आरोग्यभान**

मुलांच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी व्हिटॅमिन डी खूप महत्त्वाचे आहे. त्याच्या कमतरतेमुळे मुलांच्या शारीरिक विकासात अनेक समस्या उद्भवू शकतात.

व्हिटॅमिन डी ला ‘सनशाइन विटामिन’ म्हटले जाते. ते मुलांच्या शारीरिक विकासासाठी आवश्यक आहे. हाडे आणि स्नायूंच्या विकासात ते खूप महत्त्वाची भूमिका बजावते. व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे मुलांना मुडदूस हा आजार होतो. त्यात हाडे कमकुवत आणि पातळ होतात. इतकेच नाही तर व्हिटॅमिन डी नर्व्हस सिस्टम आणि रोगप्रतिकारक शक्तीसाठीदेखील खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे मुलांमध्ये ‘ड’ जीवनसत्त्वाची कमतरता भासणार नाही, याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.




शरीरात कॅल्शियम आणि फॉस्फरसचे शोषण करण्यासाठी व्हिटॅमिन डी आवश्यक आहे. ते हाडांसाठी खूप महत्त्वाचे आहे; परंतु व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे, शरीरात कॅल्शियमची कमतरता असते. त्यामुळे हायपोकॅल्सेमिया आणि पॅराथायरॉईड ग्रंथीच्या अतिक्रियाशीलतेमुळे हायपरपॅराथायरॉईडीझम होऊ शकतो. या दोन्ही स्थितींमध्ये थकवा, अशक्तपणा, नैराश्य आणि स्नायू कडक होणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. कॅल्शियमची कमतरता संतुलित करण्यासाठी शरीर हाडांमधून कॅल्शियम घेण्यास सुरुवात करते आणि हाडांचे डिमिनेरलायझेशन वेगाने होऊ लागते. यामुळे प्रौढांमध्ये ऑस्टिओमॅलेशिया आणि मुलांमध्ये मुडदूस हा आजार होऊ शकतो. एवढेच नाही तर व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे मूड बदलणे, नैराश्य येणे आणि रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होणे यासारख्या समस्याही उद्भवू शकतात.

थकवा, स्नायू कडक होणे, अशक्तपणा आणि वेदना, मूड स्विंग्स, नैराश्य, वाढ खुंटणे, कमकुवत प्रतिकारशक्ती, हार्मोनल असंतुलन, हाडे कमकुवत होणे किंवा वारंवार फ्रॅक्चर होणे ही या आजाराची लक्षणे आहेत. कडक उन्हामुळे आपण मुलांना नेहमी घरात ठेवण्याचा प्रयत्न करतो; पण व्हिटॅमिन डीचा मुख्य स्त्रोत सूर्यप्रकाश आहे, म्हणून मुलांना सकाळच्या सूर्यप्रकाशात किंवा संध्याकाळी उशिरा किमान ३० मिनिटे सूर्यप्रकाशात घालवण्यास सांगा. सुट्ट्यांच्या दिवशी ते सकाळी खेळू शकतात. व्हिटॅमिन डी वाढवण्यासाठी आहारात अंड्यातील पिवळे बलक, मशरूम, दूध, संत्र्याचा रस आणि तृणधान्ये यांसारख्या पदार्थांचा वापर करा. व्हिटॅमिन डीची पातळी लक्षणीयरीत्या कमी झाली असेल तर व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स घ्या.

## वाढतोय मायग्रेनचा त्रास

कधी प्रचंड डोकेदुखीसोबत असह्य वेदना जाणवत असतील, तर मायग्रेन असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मायग्रेनमुळे होणारा त्रास असह्य झाल्याने दैनंदिन काम करणेही कठीण होऊन बसते. अशा वेळी मायग्रेनला कारणीभूत ठरू शकतील अशा काही ट्रिगर्सची माहिती असणे आवश्यक आहे.



आजकाल लोकांची जीवनशैली झपाट्याने बदलत आहे. लोकांच्या आरोग्यावर कामाचा वाढता ताण आणि बदलत्या कार्यसंस्कृतीचा परिणाम होऊ लागला आहे. त्याचे दुष्परिणाम व्यक्तीच्या शारीरिक तसेच मानसिक आरोग्यावरही दिसून येत आहे. जीवनशैलीतील बदलांसोबतच खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयीदेखील अनेक आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरू शकतात. मायग्रेन यापैकी एक समस्या आहे. ही एक प्रकारचा डोकेदुखी आहे. मळमळ, उलट्या आणि अतिसंवेदनशीलता अशी मायग्रेनची लक्षणे आहेत. यावर कोणताही विशिष्ट उपचार नसल्यामुळे जीवनशैलीतील बदल आणि काही औषधांच्या मदतीने त्यावर नियंत्रण ठेवले जाते.

कामाच्या दबावामुळे आणि इतर कारणांमुळे लोकांच्या शारीरिकच नव्हे तर मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. यामुळे मायग्रेनचा त्रास सुरू होण्याची शक्यता असते. निरोगी राहण्यासाठी चांगली आणि पूर्ण झोप खूप आवश्यक आहे; मात्र बिघडलेल्या जीवनशैलीमुळे अनेकदा झोप पूर्ण होत नाही. अशा परिस्थितीत झोपेची अनियमित पद्धत, अपुरी झोप किंवा खूप झोप मायग्रेनसाठी ट्रिगर म्हणून काम करते.

कधी कधी काही पर्यावरणीय घटकदेखील मायग्रेनच्या वेदनास कारणीभूत ठरू शकतात. एखाद्या व्यक्तीला तेजस्वी प्रकाश, मोठा आवाज, तीव्र वास आणि हवामानातील बदल इत्यादींमुळेदेखील मायग्रेनचा झटका येऊ शकतो. यांव्यतिरिक्त जुने चीज, प्रक्रिया केलेले मांस आणि आर्टिफिशियल स्वीटनर हे पदार्थ संवेदनशील व्यक्तींमध्ये मायग्रेनची सुरूवात करू शकतात.

## गर्भनिरोधक गोळ्या घेताय, सावधान!

**नोंद**

अनेक महिला गर्भनिरोधक गोळ्यांचे सेवन करतात. परंतु काही महिलांवर या गोळ्यांचे दुष्परिणाम होताना दिसत आहेत. काही वेळेस गर्भनिरोधक गोळ्यांचे सेवन केल्याने महिलांच्या हार्मोन्सवर परिणाम होऊ शकतो. लठ्ठपणा वाढू शकतो.

तंत्रज्ञानाच्या या युगात शारीरिक हालचाली मर्यादित होत आहेत. बहुतांश कामे मशिनद्वारे केली जात आहेत. अशा परिस्थितीत वाढत्या लठ्ठपणाची समस्या दिसून येते. काही स्त्रियांना याचे दुष्परिणाम काही काळच जाणवतात. गर्भनिरोधक गोळ्यामुळे महिलांचे वजन वाढू शकते.


वेगवेगळ्या ब्रँडच्या गर्भनिरोधक गोळ्यांमध्ये इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टिनच्या प्रमाणात थोडासा फरक असू शकतो. बहुतेक गर्भनिरोधक गोळ्या एकाच प्रकारच्या इस्ट्रोजेनचा वापर करतात; परंतु हार्मोनल प्रोजेस्टिनचा प्रकार थोडासा बदलू शकतो. काही महिलांना अशा गोळ्या वापरण्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात काही बदल किंवा दुष्परिणाम जाणवू शकतात.

गर्भनिरोधक गोळ्यांमध्ये कालांतराने अनेक बदल झाले आहेत. अशा परिस्थितीत या गोळ्यांचे दुष्परिणाम होण्याची शक्यता बऱ्याच प्रमाणात कमी होते. पण अत्यंत क्वचित प्रसंगी काही महिलांना दुष्परिणाम जाणवू शकतात. गर्भनिरोधक गोळ्यांमुळे महिलांमध्ये मळमळ आणि गॅस्ट्रोइंटेस्टाइनल समस्या उद्भवू शकतात. पचनाच्या समस्या असलेल्या महिलांना गोळी घेण्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात हार्मोनल बदलांमुळे या समस्या जाणवू शकतात. काही महिलांना हलकी डोकेदुखी असू शकते. या काळात, एस्ट्रोजेनमधील बदलांमुळे स्तनाच्या ऊतींमध्ये सूज आणि वेदना होऊ शकतात. गर्भनिरोधक गोळ्या काही स्त्रियांमध्ये हार्मोनल चढउतारांमुळे मूड बदलू शकतात. यामुळे चिडचिड कायम राहते. गर्भनिरोधक गोळ्या घेतल्यानंतर कोणत्याही दुष्परिणामांकडे दुर्लक्ष करू नका.

## विल्सन्स डिसिजविषयी...

**व्याधी विचार**

विल्सन्स डिसिज नावाचा एक विकार आहे. अत्यंत दुर्मीळ असा हा विकार आहे. या विकारात मेंदू, यकृत आणि इतर महत्त्वाच्या अवयवांमध्ये तांबं साठून राहतं. ‘विल्सन्स डिसिज’ हा एक अनुवंशिक आजार आहे. जगभरात ३० हजारांमध्ये एका व्यक्तीला हा आजार होतो. विल्सन्स डिसिज झालेले बरेच रुग्ण ५ ते ३५ या वयोगटातले असतात. तांबं हे शरीराला आवश्यक असं खनिज आहे. अन्नातून शरीराला तांबं मिळतं. अन्नातलं तांबं शरीर शोषून घेतं. शरीरातलं अतिरिक्त तांबं पित्तातून बाहेर पडतं. हे तांबं विविध अवयवांमध्ये साचून राहणं आणि योग्य पद्धतीने बाहेर न पडणं ही विल्सन डिसिजची लक्षणं आहेत. वेळेत निदान झालं तर या





विकाराने त्रस्त रूग्ण सर्वसामान्य आयुष्य जगू शकतो. विल्सन डिसिज कोणत्या अवयवाला झाला यावरून लक्षणं ठरतात. या विकाराची लक्षणं इतर काही विकारांसारखी असतात. त्यामुळे बरेचदा गैरसमज होऊ शकतो. त्यामुळे योग्य तपासणी करून डॉक्टरांकडून याचं निदान करून घ्यायला हवं. यकृतात तांबं साठून राहत असेल तर मळमळणं, वजन कमी होणं, उलट्या, अशक्तपणा, अस्वस्थता, कावीळ, पोट फुगणं, भूक मंदावणं आणि स्नायूंमध्ये गोळे येणं अशी लक्षणं आढळतात. मेंदूत तांबं साठत असेल तर अर्धशिशी, दृष्टिदोष, बोलताना अडखळणं, विस्मरण होणं, झोपेत अडथळे, नैराश्य अशी लक्षणं आढळतात. मेंदूत तांबं साठून राहण्याची स्थिती पुढच्या टप्प्यात गेली तर चक्कर येणं, स्नायू दुखणं अशी लक्षणं दिसून येतात. शरीरातल्या इतर अवयवांमध्ये तांबं साठून राहत असेल तर मासिक पाळी अनियमित होणं, मूतखडा, आर्थ्रायटिस, रक्तदाब कमी होणं, नखांचा रंग बदलणं, हाडांची घनता कमी होणं अशी लक्षणं दिसून येतात.

मुलाला आई आणि वडिलांकडून एटीपी ७ बी हे जनूक मिळालं तर ते विल्सन्स डिसिजला कारणीभूत ठरतं. हे जनूक पालकांच्या माध्यमातून त्यांच्या मुलांपर्यंत पोहोचतं. दोन्ही पालकांमध्ये हे जनूक असेल तर ते मुलांमध्ये येण्याची शक्यता २५ टक्के असते. जनुकीय चाचणी करून विल्सन्स डिसिजचा धोका ओळखता येऊ शकतो. या विकाराचं वेळीच निदान होणं गरजेचं असतं. तसं झालं नाही किंवा योग्य औषधोपचार झाले नाहीत तर लिव्हर सिऱ्होसिस, यकृत निकामी होणं, मेंदूशी संबंधित, किडनीशी संबंधित समस्या, मानसिक आजार, रक्तविकार उद्भवू शकतात. या विकाराचं निदान कोणत्या टप्प्यात होतं त्यावर बरंच काही अवलंबून असतं.

## मानसिक आरोग्याचे संतुलन

**जाणून घ्या**

जॉगिंग आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे, याची आपल्याला जाणीव आहे. पण चालण्याचा मेंदूवर परिणाम होतो. आजच्या धावपळीच्या जीवनात लोक तणाव आणि नैराश्याचे बळी ठरत आहेत. या समस्येपासून मुक्त होण्यासाठी, दररोज १० मिनिटे चालणे खूप महत्त्वाचे आहे.




बऱ्याच संशोधनातून असे दिसून आले आहे, की दररोज दहा मिनिटेही जलद चाललात, तर शरीरात आनंदी हार्मोन्स बाहेर पडू लागतात. यामुळे मूड सकारात्मक होतो. अशा स्थितीत शरीर नियमित सक्रिय ठेवले पाहिजे. त्यामुळे तणाव आणि नैराश्य हळूहळू कमी होते. चालण्यासारखे व्यायाम केल्याने स्नायू आणि मेंदूमध्ये रक्ताभिसरण वाढते. त्यामुळे दिवसभर उत्साही वाटते.

घराबाहेर पडल्यावर पायऱ्या चढा आणि उतरा. घराच्या छतावरही फिरू शकता; मात्र घराबाहेर फेरफटका मारल्याने शरीराला अधिक फायदा होतो. मन शांत आणि आरामदायी बनते. उघड्यावर चालल्याने मानसिक ताण आणि आघात दूर राहतात. चालण्यासाठी ठराविक वेळ नाही. वेळ मिळेल तेव्हा निवांतपणे फिरायला जा. चिंतेची समस्या असेल तर फिरायलाच हवे जेणेकरून तणाव हळूहळू कमी होईल. चालण्याने मनाला शांती मिळते आणि नैराश्यही कमी होते. जास्त विचार करण्याची समस्या असेल तर जरूर फिरा. तणाव आणि नैराश्यामुळे झोपेचा खूप त्रास होतो. अशा स्थितीत चालल्याने शरीराला थकवा जाणवतो आणि चांगली झोप लागते.

## रूग्णालयात कुठे हात लावू नये?

**आपण कुठे चुकतो?**

रूग्णालयातील आप्तांना भेटण्यासाठी आपण जातो. रूग्णालयात स्वच्छतेची पुरेशी काळजी घेतली जाते, असा समज असतो. मात्र, रूग्णालयाचा कोपरा न कोपरा स्वच्छ असतो असं नाही. रूग्णालयात विविध विकार जडलेले रूग्ण असतात. त्यांना भेटायला येणाऱ्या लोकांची गर्दी असते. अशा परिस्थितीत या ठिकाणी जंतूंचा वास असतो. त्यामुळे रूग्णालयात जाण्याआधी आणि घरी आल्यानंतर हात स्वच्छ धुवून घ्यावेत. इतकंच नाही, तर रूग्णालयातल्या काही गोष्टींना हात लावताना काळजी घ्यायला हवी.



✻ रूग्णालयाच्या लिफ्टमधून रूग्णांची ने–आण होते. डॉक्टर, नर्सची ये–जा सुरू असते. अशा स्थितीत लिफ्टमधल्या बटणांवर जंतूंचा वास असू शकतो. त्यामुळे रूग्णालयातल्या लिफ्टचं बटण दाबताना टिश्यू पेपरचा वापर करा. लिफ्टमधून बाहेर पडल्यावर हँड सॅनिटायझर वापरा.

✻ रूग्णाच्या खोलीत शिरताना आपण हँडलला हात लावतो. हँडलवर प्रचंड बॅक्टेरिया असतात, असं संशोधनातून दिसून आलं. खोलीबाहेर पडल्यानंतर हात स्वच्छ धुवून घ्या.


✻ रूग्णालयात भेटीसाठी आलेल्यांसाठी खुर्च्या ठेवलेल्या असतात. त्यावरही जंतू साठलेले असतात. खुर्च्यांच्या हातांवर जंतू असतात. त्यामुळे खुर्चीवर बसण्याआधी अँटिबायोटिक वाईपचा वापर करा.

✻ रूग्णाच्या खोलीतल्या आयव्ही पोल्सवर जंतूंचा वास असतो. त्यामुळे या पोल्सना हात लागल्यास हात स्वच्छ धुवून घ्या.

## अंडाशयाच्या कॅन्सरविषयी...

**आरोग्यवेध**

सर्वसाधारणपणे रजोनिवृत्ती झालेल्या पन्नाशीच्या पुढच्या महिलांना अंडाशयाच्या कॅन्सरचा धोका असतो. पण काही महिलांना तरूण वयातही अंडाशयाचा कॅन्सर होऊ शकतो. या कॅन्सरचं निदान लवकर होत नाही. त्यामुळे कॅन्सरच्या पुढच्या टप्प्यांमध्येच त्याची लक्षणं दिसून येतात. सुरूवातीच्या टप्प्यात या कॅन्सरची कोणतीही लक्षणं दिसून येत नसल्याने अखेरच्या टप्प्यामध्ये त्याचं निदान होतं आणि महिलेला खूप मोठा धक्का बसतो. पोटात सूज येणं, वारंवार लघवीला जावं लागणं, भूक मंदावणं, पोट लवकर भरणं, ओटीपोटाच्या भागात सतत अस्वस्थता जाणवणं, तीन आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकून राहणारी पोटदुखी. कुटुंबात अंडाशय किंवा स्तनांच्या कॅन्सरचा इतिहास असेल तर धोका अनेकपटींनी वाढतो. या कॅन्सरचं वैशिष्ट्य असं कोणतंही लक्षण नसलं तरी हार्मोन्समुळे जनुकांच्या पद्धतीत बदल झाल्यामुळे अंडाशयाच्या कॅन्सरचा धोका वाढतो. हार्मोन रिप्लेसमेंट थेरेपीमुळे कॅन्सरचा धोका वाढतो. यासोबतच एंडोमेट्रिओसिस हा विकार असेल तर अंडाशयाचा कॅन्सर होऊ शकतो. स्थूलपणाही या विकाराला कारणीभूत ठरू शकतो. नफिसा यांना पेरिटोनियल कॅन्सरचंही निदान झालं आहे. हा कॅन्सर अंडाशयाच्या कॅन्सरपेक्षा पूर्णपणे वेगळा असला तरी या दोघांची लक्षणं एकसारखीच असतात. हा कॅन्सर अत्यंत दुर्मीळ आहे. पण अंडाशयाच्या कॅन्सरसोबत तो वाढू शकतो. हा कॅन्सर अंडाशयाच्या कॅन्सरप्रमाणे पसरत असल्यामुळे या दोन्ही प्रकारच्या कॅन्सरचा एकमेकांशी संबंध जोडण्यात आला आहे. या दोन्ही प्रकारच्या कॅन्सरचा सामना करणं खूप कठिण असतं.



दोन्ही प्रकारच्या कॅन्सरमुळे शरीराचं किती नुकसान झालं आहे यावर उपचारांची दिशा अवलंबून असते. कॅन्सर किती पसरला आहे, रूग्णाचं वय, कॅन्सरचा टप्पा, रूग्णाचं आरोग्य यावर बरंच काही अवलंबून असतं. रूग्णाला केमोथेरेपी द्यायची की शस्त्रक्रिया करायची याचा निर्णय घेताना डॉक्टर या सर्व बाबींचा विचार करतात. सर्वसाधारणपणे डॉक्टर शस्त्रक्रियेचा मार्ग सुचवतात. केमोथेरेपी हा दुसरा पर्याय आहे. शस्त्रक्रियेनंतर कॅन्सरच्या काही पेशी शरीरात राहिल्या असतील तर त्यांना मारण्यासाठी केमोथेरेपी केली जाते. अखेरच्या टप्प्यात कॅन्सरचं निदान झालं तर शस्त्रक्रियेमुळे रूग्णाच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कॅन्सर नियंत्रणात ठेवणं हा एकमेव उपाय उरतो. परिणामी, या कॅन्सरचं निदान सुरूवातीच्या टप्प्यांमध्ये होणं गरजेचं असतं. नियमित आरोग्य तपासणीतून या कॅन्सरचं निदान होऊ शकतं.

**नवसंशोधन**

### वाहतुकीच्या आवाजामुळे वाढते प्रदूषण!

रस्त्यावरच्या वाहतुकीच्या आवाजामुळे स्थूलपणाचा धोका वाढत असल्याचं एका संशोधनातून समोर आलं आहे. ‘द बार्सिलोना इंस्टीट्यूट ऑफ ग्लोबल स्टडीज’ तर्फे हा अभ्यास करण्यात आला आहे. याआधीही अशा प्रकारचा अभ्यास करण्यात आला होता. त्यातूनही वाहनांचा वाढता आवाज आणि स्थूलत्व यांचा संबंध जोडण्यात आला होता. आधीच्या अभ्यासांचा अहवाल योग्य आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी नवा अभ्यास करण्यात आला. आवाजात अवघ्या दहा डेसिबलची वाढ झाली तरी स्थूलपणाची शक्यता १७ टक्क्यांनी वाढत असल्याचं निरिक्षण या संशोधनातून नोंदवण्यात आलं.



**डोळ्यांचं आरोग्य**



### काळजी मुलांच्या डोळ्यांची

मुलांच्या डोळ्यांवर परिणाम करणारे बरेच नेत्रविकार आहेत. या नेत्रविकारांचं लवकर निदान झालं तर मुलांच्या डोळ्यांचं आरोग्य टिकून राहतं. लेझी आय, डोळे येणं, अश्रूनलिकेत अडथळे येणं किंवा अश्रूनलिका बंद होणं अशा समस्या मुलांमध्ये आढळू शकतात. त्यामुळे मुलांच्या डोळ्यांकडे पालकांनी नीट लक्ष द्यायला हवं.

**दंतारोग्य**

### अक्कलदाढ काढल्यानंतर...

अक्कलदाढ काढून टाकणं ही अगदी सर्वसामान्य बाब आहे. या प्रक्रियेनंतर जंतूसंसर्ग होण्याची शक्यता असते. या जंतूसंसर्गाची बरीच लक्षणं दिसून येतात. त्यामुळे दंततज्ज्ञांनी दिलेल्या सूचनांचं पालन रूग्णाने करायला हवं. अक्कलदाढ काढून टाकल्यानंतर रक्तस्राव होऊ शकतो. पण लगेच चूळ भरू नये. कारण यामुळे रक्ताच्या गुठळ्या विरघळून जातील. अक्कलदाढ काढलेल्या भागात रक्ताच्या गुठळ्या तयार झाल्या नाहीत तर त्याला ड्राय सॉकेटिस असं म्हणतात. यामुळे दात काढलेल्या भागात खूप वेदना होतात आणि बराच त्रास होतो. अडकलेल्या अन्नकणांमुळे हा त्रास खूप वाढतो.



**आजीबाईंचा बटवा**

### लवंग खाल्ल्याने...

लवंग हा भारतातल्या प्रत्येक स्वयंपाकघरात आढळणारा पदार्थ आहे. डोकेदुखीपासून दंतविकारांपर्यंत विविध विकारांवर लवंग गुणकारी ठरते. आम्लपित्त आणि गॅसच्या समस्येवर लवंग खूप प्रभावी ठरते. लवंग चघळल्यामुळे लाळेची निर्मिती होते आणि पचनक्षमता वाढते. छातीत जळजळ होत असेल तर लवंग चघळल्याने आराम पडतो. लवंगीचा एक तुकडा तोडून चघळत राहिल्याने लवकर आराम मिळतो. आम्लपित्ताची समस्या असेल तर जेवणानंतर लवंगाचा तुकडा चघळायला हवा.



**हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक ‘जनता आवाज’, मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✻ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र.** SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11